।। श्री ।।

जयरामकविविरचित

पर्णालपर्वतग्रहणाख्यान

मराठी भाषांतरासह

संशोधक कै. सदाशिव महादेव दिवेकर,
(सभासद, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे.)

प्रस्तावना

१. हे संस्कृत काव्य तंजावर येथे सरस्वती महालात मिळाले. याचा कर्ता जयराम हा असून याचे अध्याय पाच व ग्रंथसंख्या अजमासे ४०० आहे. पहिल्या अध्यायाच्या अखेरीस ''इति श्रीमज्जयरामकविविरचिते पर्णालपर्वत ग्रहणाख्याने शिवराजचरित्रे प्रथमोऽ ध्यायः '' असे म्हटले असल्यामुळे शिवराजचरित्रातील अनेक आख्यानांपैकी हे एक आख्यान असावे असे दिसते. या ग्रंथांतील अंतर्गत पुराव्यावरून देखील या कवीने अनेक व्याख्याने रचल्याचे दिसून येते व वरील विधानास चांगलाच दुजोरा मिळतो. या कवीने केलेल्या राधामाधवविलास चंपूच्या हस्तलिखित प्रतीचा शोध लागला आहे. जयराम कवींची ही दोनच काव्ये सध्या आपणास उपलब्ध झाली आहेत. परंतु त्याने याखेरीज आणखी पाचसहा तरी आख्यानकाव्ये लिहिली असल्याचे उल्लेख सापडत असल्यामुळे ती शोधून काढणे अगत्याचे आहे.

२. हे काव्य केव्हा लिहिले गेले तो काल निश्चित करणे फारसे कठीण नाही. शिवाजी महाराजानी शके १५९४ फाल्गुन वद्य १३ रोजी पन्हाळा घेतला तेव्हांपासून पुढे एक महिन्याने उम्राणीजवळ बहिलोलखानाशी प्रतापराव आणि आनंदराव यांचे युद्ध झाले. तेथपर्यंतची हकीकत या काव्यांत आली. अर्थात शके १५९५ मध्ये हे काव्य रचले गेले असले पाहिजे. जयराम शिवाजी महाराजांच्या भेटीस गेल्यानंतर सुरतेची दुसऱ्यांदा लूट झाली, तो प्रसंग १५९२ च्या कार्तिकातला आहे. त्यानंतर तीन वर्षांनी तो व्यंकोजीकडे परत येऊन सर्व हकीगत सांगत आहे. त्या अर्थी या आख्यानकाव्याचा काल शके १५९५ हाच धरला पाहिजे.

सरदारांनी हा आख्यानग्रंथ जयराम व्यंकोजीस सांगत होता त्या वेळची व्यंकोजीची मनःस्थिती लक्षात घेणे जरूर आहे. राज्याभिषेकानंतर कर्नाटकच्या स्वारीत व्यंकोजी व शिवाजी यांच्यामधील सावत्रपणाच्या संबंधास उग्र स्वरूप प्राप्त झाले. त्यापूर्वी हे काव्य लिहिले गेले असले पाहिजे. या संबंधीचा काव्यातील अंतर्गत पुरावा असा आहे

कविर्निर्वेयाच्च सर्वे कुशलपूर्वकम् ।
श्रुणु तावन्महाराज श्रीशिवस्याग्रजस्य ते ।
चरितं देववर्यस्य विष्णोरिव जगत्प्रभोः ।।
कल्किनो निष्कलंकस्य तुरुकवरमर्दनम् ।।
महाराजाधिराजोऽपि शृण्वंस्तुष्टोऽभवत्पुरा ।।
भवद्भिरपि यद्गौरीविलासाख्ये सभांतरे ।
बेंगरूलाख्यनगरे श्रुतं पूर्वार्धमादितः ।।

---

* Catalogue of SK. MSS. Bikaner, compiled by Dr. endralal Mitra i880, No. 545 p. 257.
हा ग्रंथ प्रसिद्ध संशोधक वि. का. राजवाडे यांनी विस्तृत प्रस्तावनेसह प्रसिद्ध केला होता.

व्यंकोजी म्हणाला, ''होय, मी पूर्वी तुमची काव्ये साद्यन्त ऐकली आहेत. पण तुम्ही येथून गेला त्यास तीन वर्षे झाली. तेव्हा या तीन वर्षांत झालेली हकीकत सांगा, तुम्हास राजदर्शन कसे झाले, सध्या महाराज कोणत्या गडावर आहेत आणि तुम्ही तीन वर्षांत काय काय केले ते ऐकण्याची माझी इच्छा आहे.''

कवी म्हणाला, ''मी बारा भाषांत काव्य करू शकतो. पैकी महाराष्ट्र भाषेत 'मी राजगडास घेतलेले राजदर्शन' वर्णन केले. नंतर शिवाजी महाराजांनी सुरत दुसयांदा लुटली, त्याचे वर्णन हिंदी व महाराष्ट्र दोन भाषेत केले. पुढे त्रिंबकगड घेऊन कारंजे लुटले त्याचे वर्णन महाराष्ट्र व हिंदुस्थानी भाषेत केले आहे. नंतर बागलाण, अहिवंत, मार्कंडेय, रवळाजवळा, चामुंडगिरी, हरिश्र्चंद्र, अडसर, जीवधन, विक्रमशहाचे जवार, सोमशहाचे रामनगर वगैरे गड व संस्थाने महाराजांनी लीलेने घेतली व त्यांची नवी नावे ठेवली. ते सर्व मी प्रसंगोपात सांगेनच, यांची वर्णने मी केली आहेत ती आपण ऐकावी.''

व्यंकोजींस इतकी सर्व हकीकत ऐकण्यास सवड नव्हती किंवा इच्छा नव्हती. तेव्हा त्याने ''पन्हाळ्यासारखा जबरदस्त किल्ला 'आमच्या' राजांच्या म्हणजे अदिलशहाच्या ताब्यातून तह मोडून महाराजांनी कसा व का घेतला ते ऐकण्याची माझी इच्छा आहे,'' असे सांगून कवीचा विषय मर्यादित करून दिला व कवीने आपल्या आख्यानास प्रारंभ केला. या ठिकाणी हा किल्ला घेणे किती दुष्कर होते व जयरामकवि किती अप्रासंगिक बोलत असे याचे सूचक भाषण व्यंकोजीच्या तोंडी घातले आहे. यासंबंधींचे श्लोक आहेत

तन्न कस्मादहो किञ्चिदेतावत्कर्म दुष्करम् ।।
कृतं पुनरहो उग्रं दाजीस्वामिभिरेव हि ।।
तत्सर्वमादौ ओष्यामि पश्चादन्यन्निगद्यताम् ।।

व्यंकोजीच्या या उत्सुकतेचे मर्म लक्षात येण्यास 'शके १५८९ साली वैशाखमासी बहलोलखान व राजश्री येकोजी राजे रांगणियास वेढा घातला. राजश्रींनी वेढा मारून काढला. मग भाद्रपदमासी येदिलशहाचा व राजश्री शिवाजी राजे यांचा सला झाला' हें जेधे शकावलीतील वाक्य लक्षात ठेवले पाहिजे. रांगण्याच्या वेढ्यात महाराजांच्या विरुद्ध विजापूरकरांच्या वतीने व्यंकोजीने हजर राहून महाराजांची आगळीक केली. परंतु तहामुळे ती आगळीक पचल्यासारखी झाली होती. पुढे तो तह धाब्यावर बसवून विजापूरकरांशी महाराजांनी ज्याअर्थी युद्ध आरंभिले त्याअर्थी या युद्धाचा संपर्क आपणास ही होतो किंवा कसे याविषयी संशय उत्पन्न होऊन व्यंकोजीने 'तह का मोडला गेला' असा प्रश्न केलेला दिसतो.

४. हे काव्य व्यंकोजीने कोठे ऐकिले ते निश्चित करता येत नाही. तथापि शिवराजचरित्रांतील काही आख्याने शहाजी महाराजांनी व व्यंकोजीने गौरीविलाससभेत बेंगरूळ येथे ऐकली; आणि शहाजीच्या मृत्यूनंतर व्यंकोजीने व राजवंशीय लोकांनी आणखी काही याच कवीची काव्ये ऐकली असे मागे दिलेल्या उतायांत म्हटले आहे. त्यावरून हे काव्य ऐकणारा बेंगरूळात नव्हता असे वाटते. तंजावरास व्यंकोजी केव्हा गेला हे निश्चित

होऊन शके १५९५ मध्ये तो कोठे रहात होता हे ठरविता आल्यास प्रथम ज्या दरबारात हे आख्यान म्हणण्यात आले त्या दरबारचा ठावठिकाण निश्चित करता येईल.

५. आता या काव्यात जी ऐतिहासिक माहिती ग्रंथित केली आहे तिचा सारांश असा. शके १५९१ च्या पौषांत मोगलांशी मराठ्यांचे युद्ध सुरू झाले. परंतु विजापूरकर व शिवाजी यांच्यामध्ये मात्र बिघाड उत्पन्न झाला नव्हता. नंतर सुरतेची दुसयांदा लूट केल्यापासून सालेरी येथे युद्ध होऊन जवार व रामनगर मराठ्यांच्या हस्तगत होईपर्यंत जो तीन वर्षांचा काळ लोटला तेवढयांत मोगल अगदी जेरीस आले आणि ते आपले सैन्य घेऊन औरंगाबाद व परंडा येथे आगोटीस राहिले. तेव्हा औरंगजेबाने मोगली सरदारांना पत्रे पाठवून त्यांची निर्भत्सना केली; आणि आदिल व कुतुब यांच्यासह शिवाजीच्या मुलखावर एकदम चाल करण्याचा हुकूम सोडला. परंतु हा हुकूम येऊन पोहोचण्यापूर्वी मोगली सरदारांनी शिवाजी महाराजांशी तहाचे बोलणे लावणे इष्ट आहे, असे ठरवून एक ब्राम्हण वकील पाठविला. तेव्हा महाराजांनी तोडीस तोड करण्यासाठी आपल्यातर्फे काजी हैदर यास वकील म्हणून मोगलांकडे पाठावले. अशा प्रकारे बोलाचाली सुरू असताना वर सांगितलेला औरंगजेबाचा हुकूम आला. तेव्हा त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाराजांच्या वकीलास मोगली सरदारांनी परांड्यास अडकावून ठेवले. यामुळे मोगल व मराठे यांचे पुनः युद्ध जुपले.

याच सुमारास म्हणजे १५९४ च्या मार्गशीर्षात अल्ली अदिलशहा मरण पावून त्याचा मुलगा शिकंदर तक्तनशीन झाला. हा शिकंदर वयाने लहान असल्यामुळे विजापूरचा सर्व कारभार खवासखान नावाचा वजीर पहात असे. खवासखान मोगलांच्या तंत्राने वागणारा असून त्याच्या मनांत मराठ्यांशी झालेला तह मोडून युद्ध सुरू करावे असे होते. इतर मुत्सद्यांना हे धोरण पसंत पडेना. परंतु खवासखान सर्वसत्ताधारी असल्यामुळे तो कोणास जुमानीत नव्हता. यामुळे मोगल व विजापूरकर यांच्या संयुक्त सैन्याशीं तोंड देण्याचा प्रसंग येणार असे पाहून शिवाजी महाराजांनी खवासखानाच्या हातून विजापूरची सूत्रे निघेपर्यंत त्या दरबाराशी युद्ध करण्याचे ठरवून बाबाजी पुंडे नावाच्या आपल्या वकीलास विजापुराहून परत बोलाविले.

अशी प्रास्ताविक माहिती दिल्यानंतर कवीने तिसऱ्या अध्यायापासून पन्हाळगड काबीज केल्याची मुख्य हकीकत सांगण्यास सुरुवात केली आहे. या वेळी महाराजांना मोगल व अदिलशहा या दोघांशीही एकदम बिघाड करावयाचा होता आणि दोघांची तयारी होण्यापूर्वी त्यांचा मुलूख हस्तगत करण्याचा त्यांनी विचार केला, अशा संधीत प्रतापराव व आनंदराव हे मोगलांच्या सरहद्दीवर होते. त्यांना मोगली व विजापुरी मुलूख 'इक्षुवत् निष्पीड्य' म्हणजे उसासारखा पिळून काढण्याचा हुकूम सुटला आणि येदिलच्या बंदोबस्तासाठी आनाजी पंडित व कोंडाजी फर्जंद यांना काही गुप्त बेत सांगून रवाना केले. याशिवाय गणोजीमामा व मोयाजीमामा रवळेकर यांना वस्त्रे व भूषणे देऊन निवडक लोकांसह कोंडाजीबरोबर जाण्यास सांगितले. हे सर्व लोक महाराजांना नमस्कार करून

डोक्यावर शमीची पाने खोवून गुप्तपणे निघाले. इकडे आनाजी पंडितान राजापुरास जाऊन सर्व बाजूंनी विचार करून सामग्रीची व्यवस्था केली व तिसरे दिवशी संध्याकाळी ठराविक लोक तेथे येऊन पोचले. त्यांनी घोरपडी, दोराच्या शिड्या, मेखा, बाण वगैरे सर्व सामान बरोबर आणले असून रात्री ते मोठ्या सावधगिरीने तेथून निघाले व रात्र अंधारी असल्यामुळे त्यांची चाहूल कोणास कळली नाही. अशा रीतीने ते एका किल्ल्याच्या पायथ्याशी जाऊन पोहोचले. आनाजी पंडीत आपल्या टोळीसह मागल्या बाजूस रानात दबा धरून राहिले होते; नंतर काही लोकांनी एकमेकांच्या खांद्यावर चढून व शिड्यांचा उपयोग करून किल्ल्याची अधित्यका म्हणजे माची गाठली आणि तेथे पोहोचताच एकदम कर्णा वाजवून आतील लोकांची धांदल उडवून दिली. त्या कर्ण्याच्या आवाजाने दचकून उठलेला बाबूखान नावाचा मुख्य अधिकारी ''अरे हा कर्णा कोण वाजवीत आहे?'' असे ओरडू लागला. पहारेकरी झोपेतून एकदम जागे होऊन शस्त्रे घेऊन धावले, इतर लोकही घराबाहेर आले. हे पाहून कोंडाजीने समोर जाऊन युद्धास आरंभ केला, इतक्यात पहाट झाली. तेव्हा किल्ल्यावरील मुख्य लेखक नागोजी पंडीत घराबाहेर येऊन 'हा कसला गोंधळ चालला आहे, अशी चौकशी करू लागला; तेव्हा 'अरे किल्ला शत्रूने घेतला., तू अजून झोपेत आहे की काय? असे लोक विचारू लागले. ते ऐकून नागोजी मागल्या दाराने पळून गेला. यानंतर प्रत्येक घरावर पहारेकरी ठेवून प्रमुख अधिकायांना धरून आणले, तेव्हा त्यांच्या तोंडून सर्व माहिती मिळाली व किल्ला हस्तगत झाला.

नंतर अनाजी पंडिताने किल्ला घेतल्याची बातमी महाराजांना कळविण्यासाठी जासूद पाठविला, तो दोन दिवसांत रायगडास पोचला आणि 'पन्हाळगड घेतला' असे मोठ्याने सांगतच त्याने पत्र दिले, नंतर महाराजानी त्याला शंभर होन बक्षीस देऊन त्याच्या तोंडी साखर घातली आणि गडावर नगारे वाजू लागले व बाण सोडण्यात आले, दुसरे दिवशी महाराजांनी भरजरीची वस्त्रे अंगात घालून सैन्य व मुरूदी यांसह पन्हाळगड पहाण्यास जाण्याचे ठरविले, दधिदूर्वादिकांचे दर्शन घेऊन, सवत्स गायींना स्पर्श करून व जयजयकार करणाया ब्राह्मणांना नमस्कार करून महाराज पालखीतून निघाले. तेव्हा भरलेल्या घागरी घेऊन येणाया सुवासिनी सामोऱ्या आल्या. त्यांना उजवी घालून पालखी चालू झाली. तेथून प्रथम पांचाडास जाऊन त्यानी अंबिकेचे दर्शन घेतले. पुढे महाडास दोन प्रहरचा मुक्काम करून स्वारी पौलस्त्यनगरास म्हणजे पोलादपुरास आली. तेथून पालखींतून उतरून महाराज एकटेच समर्थांच्या दर्शनास गेले, त्या संबंधींचा उल्लेख असा आहे

नरयानादवातीर्य चतुःशालं मनोरमम् ।
मन्दिराग्रं समासाद्य एक एवाग्रतोऽभवत ।।
गोस्वामिचरणद्वंयं वन्दयामास मन्दिरे ।
गोस्वामी च ततस्तस्य हस्त विन्यस्य मस्तके ।।
पूर्णसाम्राज्यदात्रीभिराशीभिः पर्यतोषयत् ।।

नंतर महाराज थोड्या लोकांसह प्रतापगडावर गेले. तेथे पालखी ठेऊन व पादुका काढून त्यांनी देवीचे दर्शन घेतले. नंतर उपचारयुक्त पूजा करून महाराज जेवण करून उठले तो सूर्य अस्ताचलास गेला व चंद्र उगवला. रात्री तेथे मोठा उत्सव करण्यात आला. नंतर पहाटे महाराज तेथून निघाले ते तीन दिवसांनी पन्हाळ्याच्या पायथ्याजवळ पोहोचले. नंतर देवतांची पूजा व पुण्याहवाचन करून ते गडावर चढले आणि किल्लयावरील अंबारे (धान्यांनी भरलेली कोठारे), तोफा, दारू, बाण, धनुष्ये, गवत, शोभने, तेले, गूळ वगैरेंचा साठा पहात व बक्षिसे वाटीत त्यांनी त्या गडावर एक महिना मुक्काम केला.

ही बातमी विजापुरास पोंचली तेव्हां बहलोलादि मुत्सद्यांनी खवासखानाची उघडपणे फजिती केली. त्याने ही चूक कबूल करून बहलोलास सेनाधिपत्य द्यावे, अशी सूचना केली. तेव्हा बहलो मोठ्या समारंभाने विजापूरातून निघून तिकोट्यास आला. नंतर आणखी सैन्य जमल्यानंतर दोन दिवसांत उम्राणीस पोचला. इतक्यात त्याच्या हाती एक पत्र आले. त्यावरून त्यास कळले की मुजाफर मलीक व सर्जाखान रांगण्याकडे सैन्यासह तयार झाले असून, आदवनीचा सिद्दी मसद, करनळचा अबदल अजीज व नळदुर्गचा खिदरखान हे तिघे सेनापती व दिलेरखान यांनी बहलोलखानास मिळावे अशी सूचना गेली आहे. तेव्हा या सर्वांना मिळवून घेऊन तुम्ही शिवाजीवर स्वारी करावी असे बहलोलास या पत्रात कळविले होते.

बहलोलाच्या हालचालींची बित्तंबातमी महाराजांना होती. त्यांनी प्रतापराव व आनंदराव यांना एकांतात बोलावून सर्व विचार केला आणि ते म्हणाले

श्रूयतां शोच्यते यावदल्पया स्वीयसेनया ।
तिष्ठन्नास्ते ह्यदूरेऽसौ तावच्छीघ्रं निगृह्यम् ।।
यथा तृणलवोप्यस्य न गच्छेत् यत्र कुत्राकुत्रचित् ।
तथा दृढनिपातोऽस्मि सिंहवद् प्रविधीयताम्।।

तात्पर्य शत्रू एकवटण्यापूर्वी त्याच्यावर एकदम तुटून पडण्याचा बेत कायम झाला, त्याप्रमाणे प्रतापरावाने सैन्यासह कोणास न कळू देता रात्री कूच करून दोन दिवसांत शत्रूचा तळ गाठला, तेव्हा शत्रूचे काही लोक तळ्याजवळ घोड्यास पाणी पाजीत होते, काही जण आराम करीत होते, तर काही जण हिंडत होते. नंतर शत्रूच्या चोहोबाजूस उभे राहून मराठ्यांनी त्यांची पाहणी केली. पुढे काहींनी तळ्यास वेढा दिला. त्यात सिद्दी हिलालखान आघाडीस होता, तेथून मागे एका कोसावर विठोजी शिंदे व बाजूस कृष्णाजी भास्कर व विठ्ठल पीलदेव हे राहिले. विसाजी बल्लाळ याने चौफेर टेहेळणी करण्याचे पत्करले, इतकी मांडणी होईपर्यंत देखील शत्रूला त्यांचा मागमूस लागला नाही. या सुमारास हत्तींचा तांडा तळ्यावर पाणी पिण्यासाठी आणला होता. तो परत नेण्यासाठी मागे वळून पाहतात तो शत्रूने आपल्या सैन्यास वेढल्याचे त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आले! इतक्यात प्रतापरावाने हजारो घोडेस्वारांसह शत्रुसैन्यावर चाल केली. तेव्हा बहलोलखानाच्या सैन्याची जी धांदल उडाली ती काय सांगावी?

हयो यो जिनो जीनो वडः खड़ो धनुर्धनुः ।।
इति व्यग्रागिरं तावत्तत्सैन्यमभवत क्षणात् ।।

नंतर चार घटकांपर्यंत मोठे कडाक्याचे युद्ध झाले. त्यात आनंदरावाने पिछाडीवर हल्ला करून व रणांगणांतील शत्रूच्या उन्मत्त हत्तीची साखळी तोडून तो मोकळा केला व वळवून नेला आणि इतर हत्तींचा असाच घोटाळा उडविण्यात आला. तेव्हा शिद्दी हिलाल, रूपाजी भोसला, सामजी मोहिता, सिधोजी निंबाळकर, विठोजी शिंदे व विठ्ठल पीलदेव हे सैन्यासह आत घुसले. महाद ठाकूर, भाईखान, नाईकजी पांढरे, खराडे वगैरे शत्रूच्या सरदारांनी त्यांना अडविले तेव्हा मोठी रणधुमाळी माजली. अशा रितीने तिसऱ्या प्रहरापासून सूर्यास्तापर्यंत हे युद्ध चालू होते. या सुमारास सिधोजी निंबाळकराने शत्रूचा हत्ती पाडाव करून राजरस्त्याने नेऊन महाराजांकडे पोचविला. इकडे बहलोलाचा आप्त महमद बक मोठ्या घोड्यावर बसून बाहेर पडला होता त्याच्यावर दीपाजी राउतराव तलवार उपसून धावला. तेव्हा बर्कीने त्याच्यावर सोडलेल्या बाणाने दीपाजीचा घोडा जखमी झाला. नंतर दीपाजी दुसऱ्या घोड्यावर बसून लढू लागला. त्यावेळी पुनः घोड्यास बाण लागला. नंतर तिसऱ्या घोड्यावर बसून राउताने बर्दीच्या मानेवर प्रहार करून त्यास खाली पाडले आणि त्या बकच्याच घोड्यावर बसून दीपाजी रणात फिरू लागला. बर्की मेल्याची बातमी ऐकून बहलोल विव्हल झाला आणि प्रतापरावाने दाखविलेल्या मार्गाने निसटून गेला. शेवटी कृष्णाजी भास्कराने शत्रूचे सैन्य लुटून हत्ती, घोडे, रथ वगैरे लूट ताब्यात घेतली.

या सारांशावरून प्रस्तुत आख्यानकाव्याची कल्पना करता येण्याजोगी आहे. केवळ ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने हे तात्पर्य काढले आहे. पण मूळ ग्रंथ इतका रसभरित व बहारीचा आहे की, तो कितीही वेळा वाचला तरी मनाचे समाधान होत नाही व प्रत्येक वाचनाच्या वेळी त्याची माधुरी वाढत्या प्रमाणात प्रत्ययास येते. हे वाचीत असता आपण उत्तम कीर्तनकाराच्या तोंडून ऐतिहासिक प्रसंगाचे वर्णन ऐकत आहो अशी खात्री पटते आणि यापुढे ऐतिहासिक उत्सवप्रसंगांत पाच दिवसांपर्यंत कीर्तनकारांची व श्रोत्यांची या आख्यानाने उत्तम सोय झाली असे वाटून मनास आनंद होतो; इतकी या ग्रंथात विविधता साधलेली आहे. जेधे शकावलीत यासंबंध ''पनालागड अण्णाजीपंत भेद करून कोंडाजी फर्जदाबरोबर लोक देऊन घेतला. साठी लोक रवाना केले त्यांनी पनाला घेतला'' व नंतर 'राजश्री रायरीहून पनाल्यास गेले तेच मासी बहलोलखान यास व प्रतापराव व आनंदराव यांसी लढाई जाहाली. विजापुराजवळ फत्ते जाहाली. एक हत्ती पाडाव जाहला अशी चार वाक्ये आहेत. ती माहितीच्या दृष्टीने बिनचूक आहेत. तरी तेवढ्याने या स्वारीचे समग्र स्वरूप लक्षात येत नव्हते ते आता येण्यास हरकत नाही. प्रो. जदुनाथ यांच्या चरित्रग्रंथांत पन्हाळा कधी घेतला याची तारीख देणारे एक व उम्राणीच्या लढाईबद्दलचे एक अशी दोन वाक्ये दिली आहेत. पैकी पहिले वाक्य बरोबर आहे. दुसरे चुकले आहे. कारण या लढाईच्या वेळी महाराज पन्हाळ्यात नसून कारवारात होते व त्यांची रसद बंद

पाडण्यासाठी बहलोलाने ही स्वारी केली असावी, असा त्यांनी तर्क केला आहे. परंतु तो बरोबर नाही.

या स्वारीसंबंधी व एकंदर शिवकालीन परिस्थितीसंबंधी बरेच विवेचन करण्याजोगे आहे. परंतु ते येथे न करता शिवभारत या नावाचा विस्तृत व महाराजांच्याच आज्ञेवरून तयार झालेला ग्रंथ सध्या छापण्यास घेतला आहे त्याच्या प्रस्तावनेत एकंदर विवेचन देण्याचा विचार आहे. तेव्हा या काव्यातील माहितीसंबंधी व येथे दिलेल्या मराठी भाषांतरासंबंधी महाराष्ट्रातील इतिहासज्ञ वाचकांना ज्या सूचना करता येतील त्या त्यांनी अवश्य कराव्या, अशी आमची विनंती आहे. येथे दिलेले भाषांतर रा. राजाराम दामोदर देसाई बी. ए. यांनी परिश्रमपूर्वक तयार करून दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच, माझे स्नेही रा. दत्तात्रय विष्णु आपटे इतिहासमंजरी कार यांनी प्रकृत ग्रंथांत श्री शिवचरित्रांतील हा पन्हाळ्यावरील स्वारीचा प्रसंग वर्णिला आहे त्यातील हकीकतीचा मेळ उपलब्ध माहिती कितपत बसतो वगैरे बाबी कसोशीने तपासून पाहाण्याचे कामात जे उत्कृष्ट साहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

कल्याण, आषाढ शु. १ शके १८४९. राजशक २५०.

कै. सदाशिव महादेव दिवेकर.

* हा ग्रंथ परिचय विषयक लेख भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दहाव्या संमेलन प्रसंगासाठी लिहिला होता व तो मंडळाच्या त्रैमासिकांत छापण्यास दिला होता. तोच येथे थोड्याशा फरकाने उद्धृत केला आहे.

श्रीगणेशाय नमः

।। पर्णालपर्वतग्रहणाख्यानम ।।

अध्याय पहिला

श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीगुरुभ्यो नमः ।।

गणाधीशं नमस्कृत्य वाग्देवीं च गुरुन्स्तथा ।

पर्णालग्रहणाख्यानं श्रीशिवाख्यस्य वयते ।। १।।

गणपति, सरस्वती आणि गुरु यांस नमस्कार करून शिवाजीने पन्हाळगड घेतला त्याचा वृत्तांत सांगतो. (१.)

तत्रातिप्रीतितः श्रोता वीरश्रयधुरंधुरः ।

निरूप्यते स एवादौ श्रुणुध्वमवधानतः ।।२।।

तो वृत्तांत अत्यंत प्रेमाने ऐकणारा जो तीनही वीरांमध्ये श्रेष्ठ राजा त्याचेच प्रथम वर्णन करतो, ते लक्ष्यपूर्वक ऐका. (२.)

आस्तेऽस्मिन भूतले श्रीमान एक एव महीपतिः ।।

सर्वलक्षणसंपन्नः शौर्यौदार्यगुणान्वितः ।। ३ ।।

ह्या पृथ्वीतलावर (दक्षिणेत) सर्वलक्षणसंपन्न व शौर्य आणि औदार्य ह्या गुणांनी युक्त असा एकोजी (अद्वितीय) नावाचा राजा वास करीत होता. (३.)

स राजा राजकार्यार्थकुशलैः सचिवैः सह ।

कविभिः पंडितैभ्रीजत सभ्याभरणभूषितः ।। ४ ।।

ज्योतिर्भिर्विद्वर्भिषग्वर्यैः शूरैर्निस्त्रिशपाणिभिः ।

अन्यैरपि सभास्तारैर्दूतैर्देशांतरागतैः ।। ५ ।।

तो राजा राजकारणात कुशल असे मंत्रि, कवि, पण्डित, तिषी, वैद्य, खड्गधारी शूरवीर आणि दुसऱ्या देशांचे वकील आणि दुसरेही सभासद यांच्या प्रभावळीने शोभत होता. (४ व ५.)

विस्तीर्णास्तरणे क्षौमचित्रकंबलशोभिते ।

सौवर्णराजतैः स्तंभैः पट्टसूत्रसुवेष्टितैः ।।६।।

नानावितानसंमिश्रवस्त्रविस्तीर्णमंडपे ।

सिंहासने स्वर्णदंडच्छत्रचामरशोभितः ।। ७।।

ज्यात विस्तीर्ण बिछायत घातलेली असून तीवर रेशमी वस्त्रे व चित्रविचित्र गालिचे पसरले आहेत, ज्याचे सोनेरी व रुपेरी खांब रेशमी सूत्रांनी उत्तम रीतीनें गुंडाळलेले आहेत, ज्याच्यावर रंगीबेरंगी अनेक प्रकारचे छत घातलेले आहे, अशा मंडपामध्ये तो सिंहासनावर विराजमान झाला असून, सोन्याचा राजदंड, छत्र आणि चामर ह्या राजचिन्हांनी भूषित होता (६ व ७.)

प्रस्फुरदुलाविद्योतवलितोत्तंसमंडितः ।
मुक्तामणिमयैर्दिव्यैः कुण्डलैः कंकणैस्तथा ।। ८ ।।
केयूरहारविलसन्मुद्रिकाभिरलंकृतः ।।
सौवर्णबिंदुललितैः प्रोल्लसद्विविधायुधैः ।। ९ ।।
भृत्यहस्तस्थितैर्हृष्टस्तालव्यजनवजितः ।।
गायकैर्वाद्यनिपुणैर्बन्दिभिः स्तुतिपाठकैः ।। १० ।।
नटनर्तकमुख्यैश्च यथास्थाननिवेशितैः ।
सभायाः पूर्वभागार्धवेदिकास स्थितैः स्तुतः ।। ११ ।।

त्याच्या मस्तकावर चमकणाऱ्या रत्नांचा तेजःपुंज शिरपेच असून (कानांत) मोत्ये व हिरे यांची दिव्य कुंडले, (मनगटांत) कडीं, (दंडांत) केयूर (बाहुभूषणे) गळ्यांत हार आणि (बोटांत) चमकणाऱ्या अंगठ्या यांनी तो अलंकृत होता. सोनेरी टिकल्यांनी शोभिवंत अशी भृत्यांच्या हातांत लखलखणारी नानाविध आयुधे पाहून त्यास हर्ष वाटत होता. त्याला ताडाच्या पंख्यांनी वारा घालीत होते. गवई, बजवय्ये, स्तुतिपाठक भाट, उत्तम नट आणि नर्तक हे सभेच्या पुढील अर्ध्या भागांत आपआपल्या स्थानी आसनांवर बसून त्याची स्तुति गात होते. (८, ९, १०, व ११.)

कृपाकटाक्षदृष्टयासौ जनः स्वामिन विलोक्यताम ।।
रौप्यवेत्रधरैरित्थं नामग्रहणपर्वकस ।। १२ ।।
निवेदितेन लोकानां निवहेन नमस्कृतः ।
अत्रांतरे समागत्य द्वाःस्थेनेत्थं निवेदितम ।। १३ ।।
यान्ति गजमारुह्य जयरामकवीश्वराः ।।
ससंभ्रमं ततो राजा हर्षोत्फुविलोचनः ।। १४ ।।
तदर्थे प्राहिणोत्तूर्णं सचिवं पंडितैः सह ।
ततस्तैरेव सहितः स विवेश सभान्तरे ।। १५ ।।

महाराज, ह्या मनुष्याकडे कृपादृष्टीने पाहावे, असे भालदारांनी प्रत्येकाचा नामोच्चार करून सांगितल्यावर त्या लोकसमुदायाने त्याला नमस्कार यथाक्रम केला. इतक्यात द्वारपालाने येऊन सांगितले की, हत्तीवर बसून जयरामकवि येत आहेत. तेव्हा राजाचे नेत्र हर्षाने प्रफुल्लित होऊन त्याने आदरपूर्वक (लगबगीने) पण्डितांसह सचिवाला त्वरेने सामोरे पाठविले. नंतर जयरामकवीने त्यांच्यासह सभेमध्ये प्रवेश केला, (१२,१३,१४ व १५.)

प्रत्युत्थानादिसन्मानैर्नमस्कृत्य ततः कविम ।
पप्रच्छ कुशलं श्रीमदग्रजस्य महीभुजः ।। १६ ।।
स्वामिनी रामचन्द्रस्य विनीतो भरतो यथा ।
कविर्निवेदयाज्चक्रे सर्व कुशलपूर्वकम ।। १७ ।।

तेव्हा एकोजी राजाने त्याच्या सन्मानार्थ उठून उभे राहून त्याला नमस्कार केला

आणि ज्याप्रमाणे विनयशील भरताने श्रीरामचन्द्रासंबंधी कुशल प्रश्न विचारले त्याप्रमाणे त्याने आपले वडील बन्धु जे श्रीशिवाजीमहाराज त्यांच्यासंबध कुशल प्रश्न विचारले. कवीने आधी सर्व कुशलवृत्त सांगितले. (१६ व १७.)

शृणु तावन्महाराज श्रीशिवस्याग्रजस्य ते ।
चरितं देववर्यस्य विष्णोरिव जगत्प्रभोः ।। १८ ।।

आणि तो म्हणाला महाराज, देवश्रेष्ठ, जगत्प्रभु विष्णूच्या चारित्रासारखे असे आपले वडील बन्धु श्रीशिवाजीमहाराज यांचे चरित्र ऐका, (१८).

कल्किनो निष्कलंकस्य तुरुष्कवरमर्दनम् । १२ ।
प्रोच्यते भावि यच्छाखने तदिदानीं निरूप्यते ।। १९ ।।

निष्कलंक कलंकी तुरुष्कांचा (यवनांचा) नाश करील असे जे शास्त्रामध्ये (पुराणांत) सांगितलेले आहे तेच आता वर्णितो. (१९)

यथाभूतं हि तत् युद्ध कविभिर्वर्णितं पुरा ।
मयापि तत्प्रसादेन किञ्चिदाकर्ण्य वर्णितम ।। २०।।

कारण त्या युद्धाचे कवींनी पूर्वी यथाभूत (जसे झाले तसे) वर्णन केले आहे, मी सुद्धा त्यांच्या कृपेने काही ऐकून वर्णन केले. (२०)

महाराजाधिराजोऽपि शृण्वंस्तुष्टोऽभवत्पुरा ।।
भवद्भिरपि यद्गौरीविलासाख्ये सभान्तरे ।। २१ ।।
बेगरूलाख्यनगरे श्रुतं पूर्वार्धमादितः ।।
तस्मादेवाहमाहूतः श्रीमद्भिः श्रोतुमुत्सुकैः ।। २२ ।।

ते श्रवण करून महाराजाधिराज (शहाजी) सुद्धा पूर्वी संतुष्ट झाले. बंगरूळ नगरी गौरीविलास नावाच्या सभेत (दिवाणखान्यात) आपणसुद्धा पूर्वार्ध आरंभापासून ऐकला. म्हणूनच आपण (पुढील चरित्र) ऐकण्याच्या उत्सुकतेने मला बोलाविलें. (२१ व २२)

ततःकतिपयैवर्षैर्मया काव्यानि तन्वता ।
छंदो विनिर्मितं तस्मिन् कृतः सर्वस्य सऽग्रहः ।। २३ ।।

पुढे काव्येरचित काही वर्षांनी मी एक काव्यग्रन्थ तयार केला व त्यात सर्वांचा संग्रह केला. (२३.)

सोऽयं सुविस्तरात्सर्वः श्रुतः किल रसाकुलैः ।
भवद्भिश्च तथान्यैश्च राजवंशधुरंधरैः ।। २४ ।।

तो हा सर्व आपण व राजवंशांतील इतर श्रेष्ठ पुरुषांनी मोठ्या तल्लीनतेने सविस्तर ऐकला. (२४.)

राजोवाच ।

श्रुतमस्ति मया पूर्वमिदानतनमादितः।
कथयतु कथं जातं भवतां राजदर्शनम ।।२५।।

इदानीं स्थीयते कस्मिन् महाराजेन पर्वते ।।
वर्षत्रयमितो गत्वा भवद्भिर्यदनुष्ठितम् ।। २६ ।।
तत्सर्वं श्रोतुमिच्छामि भवन्तः कवयः खलु।

राजा म्हणाला,

''पूर्वीचे चरित्र आम्ही ऐकले आहे. अलीकडचे आरंभापासून सांगावे. आपणास महाराजांचे दर्शन कसे घडले? हल्ली महाराज कोणत्या गडावर रहात आहेत? येथून गेल्यावर तीन वर्षांपर्यंत आपण जे काय केले ते सर्व ऐकण्याची आमची इच्छा आहे. आपण खरोखर मोठे कवी आहात'' (२५, २६ व २६।।)

कविरुवाच ।।
मया द्वादशभाषाभिः कविकर्म विरच्यते ।। २७ ।।

कवी म्हणाला...

''मी बारा भाषांमध्ये काव्य रचित असतो.'' (२७ पूर्ण.)

तस्मादादौ महाराष्ट्रभाषया किल वर्णितम ।
इतो राजगड़े गत्वा गृहीतं राजदर्शनम् ।। २८ ।।

तेव्हा प्रथम मराठी भाषेत (त्यांचे चरित्र) वर्णिले. येथून राजगडास जाऊन मी महाराजांचे दर्शन घेतले. (२८),

ततः श्रीमच्छिवेनेयं सुरती लुंठिता पुनः ।
तद्धेदुवमहाराष्ट्रभाषायुग्मेन वर्णितम ।।२९।।

त्यानंतर शिवाजी महाराजांनी सुरत पुनः लुटली. त्याचे वर्णन मी हिंदी व मराठी ह्या दोन भाषांत केले. (२९.)

ततः श्रीत्र्यंबको नाम विख्यातः पुण्यपर्वतः ।
हर्षेण सहसाप्यस्मिन प्रयाणे स्ववशीकृतः ।। ३० ।।

नंतर त्याच मोहिमेत श्री त्रिंबक नावाचा प्रख्यात पवित्र किल्ला आनंदाने एकदम हस्तगत केला. (३०)

ततः कारंजनगर श्रीकृष्णेन यथा पुरा ।
भागदत्त पुरं तद्व (त्) लुण्ठयित्वा समागतम (?) ।। ३१ ।।

त्याच्यामागून जसे पूर्वी श्रीकृष्णाने भागदत्तनगर (भागलपूर) लुटले तसे शिवाजीमहाराज कारंजा शहर लुटून आले. (३१.)

तदप्यहो महाराष्ट्र हिंदुस्थानभवेन वै ।
भाषायुग्मेन विहितं ततः सह्याद्रिमस्तकः ।। ३२ ।।
बग्गुलानामभूत पूर्व जगतीतलविश्रुतः ।
सोऽपि चात्यंतविपुलैस्ताम्रैरूपैः सुरक्षितः ।। ३३ ।।

त्याचेही वर्णन मी मराठी व हिंदी या दोन भाषांत केले, नंतर सह्याद्रीचे मस्तक जो सालेर

नावाचा बागलांच्या ताब्यातील पूर्वी पृथ्वीवर अतिविख्यात किल्ला तो सुद्धा अत्यंत विपुल व उग्र अशा ताम्रांनी (मोगलांनी) घेऊन आपल्या ताब्यात सुरक्षित ठेविला होता. (३२ व ३३.)

तेभ्यस्तं संजहाराशु महाराजो महाभुजः ।

ततः समभवद्युद्ध मध्ये मध्ये महत्तरम् ।। ३४ ।।

अलंकुरंगत्रिंगलवाटिकानामथोद्धतम् ।

अहिवंतोऽचलगिरिर्मार्कण्डेयाभिधानकः ।। ३५ ।।

रवलाजवलाख्यावप्यमलावतिदुग्रहौ ।

गृहीतवानसौ राजा महाराजोऽग्रजस्तव ।। ३६ ।।

तो त्यांच्यापासून महा बलवान शिवाजीमहाराजांनी हां हां म्हणता घेतला. त्यानंतर मधून मधून अलंग, कुरंग, त्रिंगलवाडी येथे कडाक्याचे युद्ध झाले. अहिवंतगड, अचलगड, मार्कडगड, रवळा जवळा नावाचे सुंदर व अजिंक्य किल्ले देखील आपले वडील बन्धु जे शिवाजीमहाराज त्यांनी काबीज केले. (३४, ३५ व ३६.)

तथैव चामुण्डगिरिर्हरिश्चंद्रस्तथैव च ।

महिषोप्यड्सरस्तावद गृहीतावतिसंगरात् ।। ३७।।

त्याचप्रमाणे चामुंडगड, हरिश्चंद्रगड, महिषगड आणि अडसरगड हे सुद्धा निकराने लढून घेतले. (३७.)

ततो जीवधनाख्योऽसौ यवनानां गिरिम्हान ।

जीवरूपो भवत्येषां तं च तेभ्योऽग्रहीन्नृपः ।। ३८ ।।

नंतर जीवधन नावाचा यवनांचा मोठा किल्ला त्यांचा प्राणभूत असा होता तो (किल्ला) सुद्धा महाराजांनी त्यांजपासून घेतला. (३८.)

जवार इति यद्राज्यं किरातानां पुरातनम् ।

विक्रमाख्यस्य नृपतेर्विक्रमेणाग्रहीन्नृपः ।। ३९ ।।

जव्हार नावाचे कोळ्याचे जे प्राचीन राज्य ते विक्रमशहापासून महाराजांनी पराक्रमाने घेतले. (३९.)

तथैव रामनगरं सोमशाहस्य विश्रतम ।

जगृहे लीलयैवायं लीलाविग्रहवान शिवः ।। ४० ।।

त्याचप्रमाणे सोमशहाचे रामनगर नांवाचे प्रख्यात राज्य शिवाचा अवतार जे शिवाजीमहाराज त्यांनी सहज लीलेने घेतले. (४०.)

प्रत्येकं नामकरणं नवीनं श्रीमहीभुजा ।।

कृतमग्रे प्रवक्ष्यामि कथानां वै प्रसंगतः ।। ४१ ।।

वार्णितं तदहो किञ्चिन्महाराज निशम्यताम ।।

महाराजांनी प्रत्येक गडास नवीन नाव दिले ती कथा प्रसंगाने पुढे सांगेन याप्रमाणे मी अल्पसे वर्णन केले ते आपण (महाराजांनी) ऐकावे ! (४१ व ४१।।.)

राजोवाच ।।

पनालाख्योऽति विपुलः पर्वतोस्मन्महीपतेः ।। ४२ ।।
कृतसख्यस्यापि कथं गृहीतः केन हेतुना ।
यस्मिन् धान्यानि वृक्षाश्च फलानि कुसुमान्यपि ।। ४३ ।।
गोधनं लवणं तैलं तृणं काष्ठं नवं नवम् ।
संवर्धयति सर्वत्र कौपं दिव्यमिवोदकम् ।। ४४ ।।
हर्म्याणि च महार्हाणि वाजिनां गृहराजयः ।
गजानां च प्रजानां च विलसति सलक्षणाः ।। ४५ ।।
आपणोऽप्यतिदीर्घोऽस्मिन् रत्नाकर इवापरः ।
सैनिकाश्चापि शतशश्चतुरंगबलान्विताः ।। ४६ ।।
परितः पर्यटन्नासीन्नागजित्सर्वलेखकः ।
लिखन्नपिं चं सर्वेषां वेतनं वेत्रपाणिभिः ।। ४७ ।।

राजा म्हणाला :

''पन्हाळा नावाचा आमच्या बादशहाचा अत्यंत विस्तीर्ण किल्ला बादशाहाशी सख्य, (तह) असतांहि (महाराजांनी) कसा घेतला व का घेतला?

ज्याच्यावर धान्ये, वृक्ष, फळे, फुले, गाईची खिल्लारे, मीठ, तेल, गवत, नवे नवे नानाप्रकारचे सर्पण आहे; ज्याच्यावर सर्वत्र विहीरीच्या गोड पाण्याचे वैपुल्य आहे; जेथे मौल्यवान टोलेजंग वाडे, घोड्यांच्या पागा, हत्तीखाने, लोकांची घरें यांच्या सुंदर रांगा झळकत आहेत; जेथील बाजारपेठ देखील इतकी विस्तीर्ण आहे की, ती एक दुसरा समुद्रच भासते. ज्याच्यावर चतुरंग सेनेसहित शेंकड़ो सेनापती (सरदार) ही आहेत; जेथे सर्व लेखक (चिटणीस) नागोजी पंडित (नागजित) सर्वांचे वेतन लिहीत भालदारांसह सभोंती हिंडत असतो; (४२ पूर्ण, ४३, ४४, ४५, ४६ व ४७.)

जागरूकोऽर्धरात्रावप्यतिक्रूररवान्वितः ।
शृंगघंटानिनादैश्च संमिश्रो यामिकव्रजः ।। ४८ ।।
प्राकारांतर्बहिश्चैव दीपिकाशतसंकुलः ।
जागर्ति यावन्न भवेत्तरुणो ह्यरुणोदयः ।। ४९ ।।
एतादृशोऽतिबलवान् पलाधेनातिदूरतः ।
पतगाधीश्वरेणाशु गृहीतो भुजगो यथा ।। ५० ।।
तन्न कस्मादहो किंञ्चिदेतावत्कर्म दुष्करम् ।
कृतं पुनरहो उग्रं दाजीस्वामिभिरेव हि ।। ५१ ।।
तत्सर्वमादौ श्रोष्यामि पश्चादन्यन्निगद्यताम् ।
इत्युक्तः स कविः प्राह तस्मै राज्ञे सविस्तरम् ।
आदितः सर्वमाख्यानं पनालाख्यस्य तद्यथा ।। ५२ ।।

ज्याच्यावरील पहारेकरी लोक मध्यरात्री सुद्धा जागरूक असतात आणि मोठी घोषणा करतात, शिंगे व घंटा (तास) यांचा मधून मधून निनाद करून आणि तटाच्या आत व बाहेर हातात शेकडो दिवट्या व मशाली घेऊनः चांगले उजाडेपर्यंत जागत असतात, अशा प्रकारचा अत्यंत बलाढ्य असा हा गड, ज्याप्रमाणे गरुड अति दुरून झडप घालून सापास झटकन पकडतो त्याप्रमाणे क्षणार्धात हस्तगत केला. (४८, ४९ व ५०) तेव्हा एवढ्या ह्या कृत्याला दुष्कर असं का म्हणू नये? आणि हे अचाट कृत्य दाजी स्वामींनी (शिवाजीमहाराजांनी) केले, (५१.) ती सर्व हकीकत मला प्रथम ऐकावयाची आहे. मागाहुन दुसरे वृत सांगावे. याप्रमाणे राजाने म्हटल्यावर त्या कवीने त्यास पन्हाळगडचा (स्वारीचा) सर्व वृत्तांत आरंभापासून सविस्तर सांगितला. तो येणेप्रमाणे(५२)

कविरुवाच ।।

अधिकतरदयावान् दीर्घकालं निमग्नम्
सुतमिव तुहिनाद्रेः सान्त्वयन् भीतपूर्वम् ।।
शिवधराणमहेन्द्रः तं पनालाख्यमेवम्
यवनजलधिमध्यादुच्चकैरुजहार ।। ५३ ।।
इति श्रीमजयरामकविविरचिते पर्णालपर्वत
ग्रहणाख्याने शिवराज चरित्रे प्रथमोऽध्यायः
।। श्रीरघुनाथार्पणमस्तु । श्रीरामचन्द्रार्पणमस्तु ।।

कवी म्हणाला :

इंद्राच्या भीतीने दीर्घ काल समुद्रात बुडून राहिलेल्या मैनाकाप्रमाणे त्या पन्हाळगडास अत्यंत दयाळू शिवाजीमहाराजांनी धीर देऊन यवनरूपी समुद्रातून अशाप्रकारे वर काढले.

श्रीजयरामकवीविरचित शिवचरित्रांतील पन्हाळगडग्रहणाख्यानाचा पहिला अध्याय समाप्त.

श्रीरघुनाथार्पणमस्तु । श्रीरामचन्द्रार्पणमस्तु ।

****

अध्याय दुसरा

कविरुवाच ।।

क्षन्तव्यो मामकस्तावदसौ ह्यविनयो महान् ।
बालिशेन पुरा योसावतिलौल्यतया कृतः ।। १ ।।
यतो द्वादशभाषाणां कविरित्यभिधायितम् ।
तत्रापि संस्कृतैः काव्यं कर्तव्यं त्वतिदुर्घटम ।। २ ।।
तस्मादस्मद्गुरुभ्योऽसावंजलिः प्रविधीयते ।
कृपाकटाक्षपाताभ्यामनुग्राह्यो भवाम्यहम् ।। ३।।
इति संप्रार्थ्य मनसा गुरु सभ्यस्तथैव च ।
चरितं शिवराजस्य प्रोच्यते तन्निशम्यताम् ।। ४ ।।

कवि म्हणाला

मी बारा भाषांत काव्य करतो, असे म्हणून म्यां मूर्खाने अतिलोभीपणाने जो पूर्वी मोठा उद्धटपणा केला, त्याबद्दलअगोदर मला क्षमा करावी. त्यांतल्यात्यांत सुध्दां. संस्कृत भाषेत काव्य रचणे अति कठीण आहे. (१ व २.)

म्हणून आमच्या गुरूंना हा प्रणाम करतो, मजकडे कृपादृष्टीने पाहून माझ्यावर अनुग्रह करावा, अशी गुरूंची आणि सभासदांची मनाने प्रार्थना करून श्री शिवाजीमहाराजांचे चरित्र वर्णितो ते श्रवण करावे. (३ व ४.)

जातं किल महद्युद्ध तात्रैः सालेरिपर्वते ।
तस्मादतीव संक्रुद्धो दिल्लींद्रः स्वस्य सैनिकान् ।। ५ ।।

सालेरीच्या किल्यावर ताम्रांशी (मोगलांशी) मोठे युद्ध झाले. तेव्हा दिल्लीचा बादशाहा आपल्या सेनापतींवर अतिशय रागावला. (५.)

लिखित्वा प्रेषयामास पत्रमेतादृशं तदा ।
बाहादुरदिलेलाद्याः शृण्वतां शासन मम ।। ६ ।।
मृतं किमिति नो तस्मिन् युद्धात् सालेरिपर्वते ।
कथमेतेऽतिविख्याताः शूराः परिघबाहवः ।। ७ ।।
आहवेनैव विधृतास्तेनैते शाहसुनुना ।
देशोप्यशेषतरतावल् लुण्ठितस्तेन मामकः ।। ८ ।।

आणि त्याने त्यांस पुढील प्रमाणे पत्र लिहून पाठविले, ''बहादूर, दिलेर वगैरे सेनापतीनों, माझा हुकूम ऐका. तुम्हांस सालेरीच्या किल्यावरील लढाईत मरण कां बरे आले नाही? हे अतिविख्यात व महाबाहु योद्धे शहाजीच्या पुत्राने (शिवाजीने) युद्धामुळे कसे अडवून धरले? माझा सर्व मुलूख सुद्धा त्याने लुटला आहे. (६, ७ व ८.)

पर्वताश्चातिविख्याता राजपुत्रैः सुरक्षिताः ।

क्षणेन तेन ते सर्वे राजपुत्रा महाबलाः ।। ९ ।।

बंधुभिः पुत्रदारैश्च सहितास्तत्र पातिताः ।

तेषां तत्कदनं श्रुत्वा मया किं जीव्यतेऽधुना ।। १० ।।

आणि राजपुत्रांनी उत्तम रीतीने रक्षिलेले अतिविख्यात किल्लेहि लुटले आणि त्या सर्व बलाढ्य राजपुत्रांस त्यांचे भाऊ, मुले व बायका यांसह त्याने एका क्षणात ठार केले. त्यांची ती कत्तल ऐकून मी आता जीव कसा ठेऊ! (९ व १०)

कथमेतादृशं कर्म समीपस्थैर्विलोक्यते ।

किं तेन भवतां शक्तिर्महत्कार्य प्रकुर्वताम् ।। ११ ।।

ताक्षेणेव भुजंगाना प्रशमं प्रापिता किल ।।

यदिलोऽपि समीपस्थस्तथाऽसौ कुतुपोऽपिच ।। १२ ।।

फैरंगिणश्च कार्णाटाः श्यामास्याः सिन्धुमध्यजाः ।।

उपायनान्यनेकानि प्रेषयन्ति स्वगुप्तये ।। १३ ।।

तुम्ही जवळ असून त्याचे असले कृत्य पहात स्वस्थ कसे बसला! गरुड जसा नागांना हतबल करतो त्याप्रमाणे त्याने मोठमोठे पराक्रम करणाऱ्या तुम्हास खरोखर हतबल करून टाकावे की काय? शेजारचा आदिलशाहा, त्याच प्रमाणे कुतुबशाहा, फिरंगी, कर्नाटकी, शामास्य (काळ्या तोडांचे हबशी) आणि सिन्धुमध्यज (इंग्रज) हे देखील स्वसंक्षणार्थ त्यास अनेक नजराणे पाठवितात ह्यास काय म्हणावे ! (११, १२ व १३.)

देश एव किर्यास्वस्य दत्वा सख्येन तिष्ठता ।

यदिलेनातिसूढेन कथं तूष्णीं निलीयते ।। १४ ।।

तो अति मूर्ख आदिलशाहा त्याला प्रत्यक्ष किती तरी मुलुख देऊन त्याच्याशी तह करून भीतीने कसा गप्प लपून बसला आहे? (१४.)

लक्षद्वयं त्रयं चैव वराहाणां स्वमस्तके ।

गृहीत्वास्मै तरुष्कोऽपि प्रददौ कुतुपोप्यसौ ।। १५ ।।

तुर्की कुतुबशाहाने सुद्धा दोन तीन लाख होन आपल्या डोक्यावरून नेऊन त्याला दिले. (१५.)

अन्येऽपि बहवस्तेन दर्पणैव विनिर्जिताः ।

न स्वपन्ति दिवारात्रौ स्वस्वदुर्गे सुरक्षिते ।। १६ ।।

याशिवाय आणखीही पुष्कळांना त्याने तोऱ्यानेच जिंकले आहे. आपआपल्या सुरक्षित किल्लयांत असून सुद्धा त्यास रात्री किंवा दिवसा झोप लागत नाही. (१६.)

तस्मात्सर्वे भवन्तश्च तेऽपि तद्भयपीडिताः ।

एकीभूय चतुर्दिक्षु धावयित्वा समंततः ।। १७ ।।

देशादिकं गृहीत्वास्य रोधः किं न विधीयते ।

ततस्ते रोधिताः सर्वे प्रदेशास्तस्य दुर्मतेः ।। १८ ।।
पश्चात् किं तेन कर्तव्यं पर्वताग्रस्थितेन वै ।
एवं बहुविधं क्रौर्यात् लिखितं तेन शासनम् ।। १९ ।।

तेव्हा त्याच्या (शिवाजीच्या) भीतीने गांगरलेले ते व तुम्ही सर्व एक होऊन चोहीकडून धावून येऊन त्याचा मुलूख वगैरे काबीज करून तो वेढीत का नाही? त्याप्रमाणे त्या दुष्टाचे सर्व प्रदेश वेढून टाकले म्हणजे मग तो किल्ल्यावर बसून राहून काय करणार?'' याप्रमाणे त्याने त्यास कडक हुकूम लिहून पाठवला. (१७, १८ व १९.)

श्रुत्वा प्रत्युत्तरं ताभ्यां लिखितं तन्निशम्यताम् ।
आज्ञाप्रमाणमस्माकं नास्ति काचिद्विचारणा ।। २० ।।

तो ऐकून त्या दोघांनी त्यास जे उत्तर लिहिले ते ऐका. ''आपली आज्ञा आम्हांस प्रमाण आहे. त्याची चिकित्सा करण्याचे काही कारण नाही. (२०.)

निदेशकारिभिः कृत्ये कर्तव्यः कथमाग्रहः ।
वयं तावत् गृहोत्पन्ना वर्धिताश्चैव भूरिशः ।। २१ ।।

आपल्या हुकुमाचे ताबेदारांनी करावयाच्या कामात आपला हेका चालविणे कसे शोभेल? आम्ही तर आपल्या घरी जन्मलो व उत्तम रीतीने वाढविले गेलो. (२१.)

तस्मादस्मद्विधैस्तावत् पाल्या ह्याज्ञैव केवलम् ।
गम्यतेऽद्यैव तद्देशे स्वामिना शासनादितः ।। २२ ।।

म्हणून आमच्या सारख्यांनी केवळ आज्ञेप्रमाणे वागावे हेच योग्य. आजच्या आजच आपल्या हुकुमावरून आम्ही येथून त्याच्या मुलुखांत शिरतो. (२२.)

परं विज्ञाप्यते किञ्चित कृपया तद्विचार्यताम् ।
बद्धसूलो रिपुस्तावदुपायज्ञोऽपि भूरिशः ।। २३ ।।

परंतु आमची एक विनंती आहे, तिचा कृपा करून विचार व्हावा. 'शत्रु (गनीम) बद्धमूल झाला असून तो मोठा युक्तिबाजहि आहे.' (२३.)

जैतव्यः कथमस्माभिः शतवर्षमधःस्थितैः ।
पर्वतानां शतं तावद्धान्यमुत्पद्यते यतः ।। २४ ।।

तेव्हा शंभर वर्षांपर्यंत सपाट प्रदेशावर (खाली) राहिलेल्यांनी आम्ही त्यास कसे जिंकावे? कारण तेथे शेकडो खंडी (पर्वतासारखे ढीग) धान्य उत्पन्न होते. (२४.)

तादृशं च तथैवान्यं नवीनं प्रविधीयते ।
प्रत्येक पर्वते तस्मिन् सहस्रद्वितयत्रयम ।। २५ ।।
सैन्यं संस्थापितं तस्य कर्तृत्वं च निगद्यते ।
पर्वतादर्धमायान्ति पत्तयः सर्वतो दिशम् ।। २६।।
यद्यन्निष्पद्यते तत्तल्लंठयित्वा समंततः ।
मूषका इव निर्यान्ति लोकानां प्राणमोषकाः ।। २७ ।।

व प्रत्येक किल्ल्यावर दोन तीन हजार सैन्य ठेवलेले आहे. त्या सैन्याचे कर्तृत्व सांगतो. हे पायदळ किल्ल्यावरून अर्धे खाली उतरून सर्व दिशांस पसरतात आणि आसमंतात भागी जे जे काही उत्पन्न होते ते ते सर्व लुटून लोकांचे प्राण हरण करणारे हे लोक उंदिराप्रमाणे सुटदिशी निघून जातात. (२५, २६ व २७.)

अस्माकमश्ववाराणां सैन्यं संभूय तिष्ठति ।

तस्योपर्येव विख्यातः शिवोऽसौ युद्धदुर्मदः ।। २८ ।।

श्येनवत् सेनया सार्धं निपतत्यसिहस्तकः ।

स केन रक्षणीयोऽस्ति मामकीनैरधःस्थितैः ।। २९ ।।

आमचे घोडेस्वारांचे सैन्य एकत्र जमून उभे असते, त्यावर विख्यात व लढाईत अति उग्र असलेला शिवाजी हातात तरवार घेऊन सैन्यासह बहिरी ससाण्याप्रमाणे झडप घालतो. किल्ल्याखाली (सपाट प्रदेशावर) राहणाऱ्या आमच्या सैनिकांनी कोणत्या रीतीने त्याचे निवारण करावे? (२८ व २९)

अफ्जलोऽपि हतो येन एकेनैव महामतिः ।

महाबलो महाबाहुरेदिलस्यातिसंमतः ।। ३० ।।

आदिलशाहाचा प्रिय सरदार जो मोठा बुद्धिमान, अत्यंत बलवान व महाबाहु अफझल त्यास सुद्धा त्याने एकट्याने ठार मारले. (३०.)

तथैवान्ये मुषाखानप्रमुखाः शतशो हताः ।

ततस्तैस्तत्र निपुणैः सख्यं कृत्वोपसात्वितः ।। ३१ ।।

त्याचप्रमाणे मुसाखानप्रभृति दुसरे शेकडो सरदार त्याने मारले. तेव्हां शहाण्या सरदारांनी त्याच्याशी सख्य करून त्यास शांत केला. (३१.)

स्वामिनो मातुलस्तावच्छास्तिखानोऽतिवीर्यवान् ।

लक्षद्वयाश्ववाराणां गजाना शकटादिभिः ।। ३२ ।।

प्राकारस्थोऽतिसंनद्धः सदैवासीत्सुरक्षितः ।

तस्य पुत्रोऽपि तत्तुल्यो भवद्भिर्वर्धितोऽभवत् ।। ३३ ।।

आपला मामा अत्यंत वीर्यवान शाइस्तेखान हा दोन लाख घोडेस्वार व हत्ती यांचे पाचरेच्या आकाराचे व्यूह रचून सदोदित जय्यत तयार राहून सुरक्षितपणे तटबंदीत राहत होता. त्याचा पुत्र देखील त्याच्याच तोडीचा असून आपणच त्याला वाढविले होते. (३२ व ३३.)

रावणस्य यथा पुत्रः शक्राजिद्राक्षसस्तथा ।

लक्ष्मणेन यथापूर्व लंकायां विनिपातितः ।। ३४ ।।

तद्वच्छिवेन तनाजौ शक्त्या विनिहतः स्वया ।

ततः स शास्तखानोऽपि छद्मना केन निर्गतः ।। ३५ ।।

रावणाचा पुत्र इंद्रजित यास जसे लक्ष्मणाने लंकेमध्ये मारले त्याप्रमाणेच त्या शिवाजीने त्याला लढाईत स्वशक्तीने ठार केले, त्यानंतर शाइस्तेखान कोणत्या वेषाने निसटला? (३४ व ३५.)

तत्सर्व स्वामिभिस्तावन्न श्रुतं वा न वीक्षितम् ।
भवतामग्रतोत्युग्रैः सभायां तैमहत्तरैः ।। ३६ ।।
दशद्वादशसाहस्त्रैरश्ववाराधिपैः स्थितम् ।
तत्राप्यशस्त्रककरः क्रूरत्वं न विमुक्तवान् ।। ३७ ।।

ती सर्व हकीकत तर स्वामींनी (दिल्लीपतींनी) ऐकली नाही किंवा पाहिली नाही. आपल्या समोर दरबारामध्ये दहा बारा हजार अत्यंत उग्र मोठमोठे घोडेस्वाराचे मुख्य होते तेथे सुद्धा तो (शिवाजी) निःशस्त्र असताही नरम झाला नाही. (३६ व ३७.)

द्रष्टव्यं स्वाभिभिस्तत्र कियद्यत्नेन रक्षितः ।
तथापि पक्षिवत्तूर्ण पुत्रेण सह निर्गतः ।। ३८ ।।

आपणच पहा की, आपण त्यास किती काळजीने तेथे पाहऱ्यांत अडकवून ठेवला होता; तथापि तेथून तो आपल्या पुत्रासह पक्ष्याप्रमाणे कसा झटदिशी निसटून गेला! (३८.)

तादृशेऽस्मिच्छिवे शत्रौ नानाछद्मसमन्विते ।
स्वामिना शासनाद्भीतैरस्माभिः परिधाव्यते ।। ३९ ।।

असला हा जो कपटपटु शिवाजी शत्रु त्याच्यावर स्वामींच्या हुकूमाने आम्ही भिऊन चालून जात आहो. (३९.)

यत्रयत्र ततस्तेन सैव (सर्वो?) मागो निरुध्यते ।
न पक्षीरपि निर्गच्छेत तस्मात्पर्वतसंकटात् ।। ४० ।।
तस्मादस्माकमश्वानां लक्षमप्यतिशिक्षितम् ।
धावने नर्तने चैव तथैव परिवर्तने ।। ४१ ।।
समीपं नीतमप्यस्मिन् किं करिष्यति कथ्यता ।
तन्मध्ये दाक्षिणात्या ये स्वामिनां वै पुरातनाः ।। ४२ ।।
वर्तते तेषु मुख्योऽसौ जाधोराया महाबलः ।
स तस्य मातुलसुतः स्वसैन्यपरिवारितः ।। ४३ ।।
तथैव हबसीसिद्धी हिलालाख्योऽतिवीर्यवान् ।
द्वावष्यमू जनस्थानान्निर्गतौ स्वामिना भयात् ।। ४४ ।।

त्याने ज्या ज्या ठिकाणी सर्व मार्ग रोखून धरले आहेत त्या त्या डोंगरी बिकट जागांतून बगल देऊन अथवा पंखांनी उडून जाणे शक्य नाही. म्हणून दौड दुडकी चाल आणि वळणे ह्यांमध्ये उत्तम रीतीने शिकविलेला असा आमचा एक लाख घोडा जरी त्याच्यावर घेऊन गेलो, तरी त्याचा काय उपयोग ते आपणच सांगावे. त्यांतून आपल्या सैन्यात पुरातन असे जे दाक्षिणात्य लोक आहेत त्याच्यातील मुख्य जो बलाढ्य जाधवराव तो त्याचा मामेभाऊ आहे. तो स्वसैन्यासह तसाच हिलाल नावाचा महापराक्रमी हबसी सिद्दी हे, दोघेही नाशिक प्रांतातून स्वामींच्या (दिल्लीपतींच्या) भीतीने निघून गेले. (४०, ४१, ४२, ४३ व ४४.)

ततोऽन्ये तेषु ये केचित् तद्दुःखपरिपीडिताः ।

विमनस्का निरालंबा बंभ्रमन्त्यनिशं भ्रमात् ।। ४५ ।।

नंतर त्यांच्या मध्ये दुसरे जे कोणी त्या दुःखाने त्रस्त झालेले खिन्न व निराधार असे लोक आहेत ते गोंधळात पडून एकसारखे भटकत आहेत. (४५.)

एको विभीषणस्तेन रावणेनापमानितः ।

ततस्तस्य कथं जातं तन्न किं स्वामिभिः श्रुतं ।। ४६ ।।

रावणाने एकट्या बिभीषणाचा अपमान केला त्यामुळे त्या रावणाची काय दशा झाली हे आपण ऐकले नाही काय? (४६.)

ज्वलयत्येव सर्वांगं कञ्चुकादग्निरुत्थितः ।

तद्वत् संवर्धितावेतौ निश्वसन्ताविवोरगौ ।। ४७ ।।

तौ तत्पर्वतदुर्गस्थौ कथं नापकरिष्यथः ।

तस्मादकः प्रकारोऽसावस्माभिः प्रविलोक्यते ।। ४८ ।।

ज्याप्रमाणे अंगरख्यातून उत्पन्न झालेला अग्नि सर्वांग जाळल्याशिवाय राहत नाही, त्याप्रमाणे आपण उत्तम रीतीने वाढवलेले व त्याच्या डोंगरी किल्ल्यात जाऊन राहिलेले हे दोघे सेनापती फूत्कार करणाऱ्या नागाप्रमाणे अपकार केल्याशिवाय कसे राहतील? तेव्हा यांतून आम्हास एकच मार्ग दिसतो. (४७ व १८.)

सख्यसंख्येन जेतव्यः केवलेनामलेन सः ।

स्वामिभिस्तेन युद्धयद्भिः व्यतीता वर्षविशतिः ।। ४९ ।।

तन्मध्ये सार्धवर्षे वा वर्षे वा सख्यतो ह्यसौ ।

स्वचशे स्थापितस्तावत् पुनरुत्थापितो यथा ।। ५० ।।

तो कोणता म्हणाल तर त्याच्याशी रास्त तह करून त्याला जिंकणे हाच होय. स्वामींनी वीस वर्षे त्याच्याशी युद्ध करण्यात घालविली. त्यापैकी वर्षे दीड वर्ष काय ते त्याच्याशी सख्य (तह) करून त्यास आपल्या ताब्यात ठेविले होते. परंतु त्याचा परिणाम त्याला चेव आणण्यातच झाला आहे. (४९ व ५०.)

तद्वद्विचार्य चाराणामग्रणीः सः हितो द्विजः ।

दूतत्वे प्रेषितोऽस्माभिर्भाषाभिज्ञोऽभवद्यतः ।। ५१ ।।

तेव्हा विचार करून हेराचा अग्रणी तो हितकर्ता ब्राह्मण चांगला भाषाभिज्ञ असल्यामुळे आम्ही वकील म्हणून पाठविला. (५१.)

ततस्तेनातिनिपुणं प्रविचार्य विवेकतः ।

काजी हैदरनामासौ प्रेषितो यवनोत्तमः ।। ५२ ।।

तेव्हा त्याने (शिवाजीने) अत्यंत शहाणपणाने व सावधगिरीने विचार करून काजी हैदर नावाचा यवनोत्तम पाठविला आहे. (५२.)

स यावत् स्वामिनामाज्ञाप्रकारो नावलोक्यते ।
तावत्संस्थापितोऽस्माभिः भृत्यैराज्ञानुवतिमः ।। ५३।।

स्वामींचा कोणत्या प्रकारचा हुकूम येतो आहे, हे कळेपर्यंत त्यास आपल्या हुकुमाचे ताबेदार नोकर जे आम्ही त्यांनी ठेवून घेतला आहे. (५३.)

कविरुवाच ।।

इति नयभयभीतैः दुर्विनीतैर्विनीतैः
प्रणयविघटनार्थ किं नु तत् घट्टनार्थम् ।
वृतिवलयवितण्डे स्वे परण्डाख्यदुर्गे
निगडितचरणस्तैः तिष्ठति स्थापितोऽसौ ।। ५४ ।।

कवि म्हणाला :

याप्रमाणे पुढे कसे वागावे ह्या भीतीने गांगरलेल्या व मूळचे उद्धट पण संकटामुळे नरम झालेल्या त्या सेनापतींनी स्नेह मोडण्याकरिता म्हणा किंवा जोडण्याकरिता म्हणा त्यास (काजी हैदरास) पायांत बेड्या घालून आपल्या कुंपणाच्या वेष्टनाने अभेद्य अशा परंडा नावाच्या किल्यात ठेवून दिला. (५४.)

इति श्रीमज्जयरामकविकृतौ शिवराजचरित्रवर्णनं नाम
द्वितीयोऽध्यायः । श्रीराम श्रीरघुनाथार्पणमस्तु ।।

श्री जयराम कविकृत काव्याचा शिवराज चरित्रवर्णन नावाचा दुसरा अध्याय समाप्त झाला.

।। श्री राम ।। श्रीरघुनाथार्पणमस्तु ।।

****

अध्याय तिसरा

राजोवाच ।।

तत्पश्चादग्रजैःश्रीमत्स्वामिभिः किमनुष्ठितम् ।
प्रोच्यतामादितः सर्वे संधिभंगोऽभवत्कथम् ।। १ ।।

राजा (एकोजी) म्हणाला :

त्यानंतर आमचे वडील बन्धु श्री शिवाजीमहाराज यांनी काय केले ते सर्व आरंभापासून सांगा. (विजापूरच्या बादशाहाशी असलेला) तह कसा मोडला ते ही सांगा. (१.)

कविरुवाच ।।

भवतां यः खवासाख्यः खान इत्यभिधीयते ।
तेनैतत्सर्वमाक्रान्तं तन्न किं ज्ञायतेऽपरम् ।। २ ।।
पत्युरंतःपुरमपि प्राकारांतर्गतं ततः ।
महाराजोऽतिधर्मात्मा शिवराजोऽग्रजस्तव ।। ३ ।।
स्वगतं चिन्तयामास तथा च कविभिबुधैः ।
दृष्टं किल खलस्यास्य खवासाख्यस्य दुर्मतेः ।। ४ ।।
चरितं वर्वरीत्येतत् स्वस्य राज्यस्य मञ्चकम् ।
यदा येदलशाहेन स्वपदे स्थापितः सुतः ।। ५ ।।
औरसोऽतिलघुस्तस्य साचिव्येऽसौ व्यवस्थितः ।

आपला जो खवासखान नावाचा सरदार त्याने हे सर्व व्यापले हे माहीत नाही काय? आणखी त्याने तटाच्या आतील आपल्या धन्याचे अन्तःपुर देखील ताब्यात घेतले! तेव्हा आपले वडील बंधु अत्यंत धर्मनिष्ठ शिवाजीमहाराज आपल्या मनाशी विचार करू लागले व शहाण्या सुर्त्या लोकांचाही सल्ला मसलत घेतली आणि असे पाहिले की, हा दुष्ट व नीच खवासखान आपले पाय पसरीत चालला असून त्याचे हे वर्तन आपले राज्यास धोका आणणारे आहे. जेव्हा आदिलशाहाने आपल्या अगदी अल्पवयी औरस मुलास गादीवर बसविले, तेव्हा त्याने खवासखान त्याचा प्रधान नेमिला. (२, ३, ४, ५ व ५।।.)

ततोऽवरंगशाहस्य तथैव कुतुबस्य च ।। ६ ।।
उपायनादिदानेन तोषयित्वा पुरातनान् ।
सैनिकानविचार्यैव पातशाहपदे स्थितम् ।। ७ ।।
ररक्ष स्वाम्यहो एतन् महाराजो महामतिः ।
तद्विजापूरमेतेन श्यामास्येन विनाश्यते ।। ८ ।।

त्याने औरंगशहा व कुतुबशहा यांस नजराणे वगैरे देऊन संतुष्ट केले पण परंपरागत जुन्या सेनापतीची सल्लामसलत मुळीच न घेता पातशाहपदाधिष्ठित मुलाचे तो धनी (स्वामी) बनून रक्षण करू लागला. हे (काय चालले आहे) असे महाबुद्धिमान शिवाजीमहाराजांस वाटले.

महाराज शहाजीराजे यांनी जे विजापूरचे राज्य राखीले होते त्याचा हा काळतोंड्या(सिद्दी खवासखान) त्या विजापुराचा नाश करतो आहे. (६ पूर्ण, ७ व ८)

तस्मादस्माभिरेवादौ गृहीत्वा तत्पुरं महत् ।
पश्चात तस्य सुतायैव देयं नो चेन्निमज्जति ।। ९ ।।

तेव्हा ते मोठे शहर आपणच आधी घेऊन मागाहून त्याच्या (बादशाहाच्या) मुलासच द्यावे नाही तर ते बुडते. (९)

ततो ह्यानन्दराजस्य प्रतापविधिपूर्वकम् ।
पत्रं व्यलेखयत्तूर्ण लेखकैमैत्रकोविदैः ।। १० ।।

असा विचार करून सल्ला मसलतीत कुशल अशा चिटणीसांकडून आनंदरावास ताबडतोब प्रतापविधिपूर्वक (शूरास योग्य अशा प्रकारे किंवा ज्याप्रमाणे प्रतापरावास लिहिले होते त्याप्रमाणे) पत्र लिहविले की, (१०)

देशोऽवरंगशाहस्य तथैव कुतुबस्य च ।
अन्येषामपि यः कश्चिन्मध्ये मध्ये व्यवस्थितः ।। ११ ।।
स सर्वोपेक्षुवत्तावद्विनिष्पीड्योज्झितो भवेत्।।
ततस्तैरतिनिर्विस्मैः (ण्णैः?) सख्यं कर्तुं विचार्यते ।। १२ ।।

औरंगशाहाचा आणि कुतुबशाहाचा त्याचप्रमाणे दुसऱ्या कोणाचा मुलूखमध्ये असेल तो झाडून सर्व ऊसाप्रमाणे पिळून काढून उध्वस्त करा म्हणजे ते जेरीस येऊन तह करण्याचा विचार करतील. (११ व १२.)

तस्माद्विहाय तद्देशं स्वसैन्यपरिवारिताः ।
संभूय वायदेशादि यावल्लक्ष्मेश्रवरो भवेत ।। १३।।
तावत्ततोऽपि पुरतः कर्तव्यः स्ववश ह्यसौ ।
एवं ऋद्धो महाराजः तुरुष्के दुष्टकर्मणि ।। १४ ।।
स्वकीयदूतवयसौ श्रीमद्बाबाजिनायकः ।
तूर्णमाकारितस्तस्माबुद्धया यो धिषणाधिकः ।। १५ ।।

याकरिता तेथून तो मुलुख सोडून आपल्या सेनेसह एकत्र मिळून तुम्ही वाईपासून लक्ष्मेश्वरापर्यंतचा व त्याच्याही पुढील प्रांत आपल्या ताब्यात आणावा. याप्रमाणे त्या दुष्टक तुरुष्कावर (खवासखानावर) रागावलेल्या महाराजांनी राजश्री बाबाजीनाईक नावाच्या आपल्या बृहस्पतीपेक्षाही शहाण्या अशा वकीलास त्याजपासून ताबडतोब परत बोलावले. (१३,१४ व १५.)

अभ्यर्णमागते तस्मिन दूतवर्येऽतिकोविदे ।
ततः प्रस्थापयाज्चक्रे स्वसैन्यपरिवारितम ।। १६ ।।
जानानं सर्वकार्यार्थमा ना जीपंडित जवात ।
सार्धं प्रस्थापितः पश्रचात कोण्डाजी नाम चिनुतः ।। १७ ।।
याप्ययानादिदानेन नानावखैरलंकृतः ।

सुवर्णवलयद्वंद्वं तत्करद्वंद्वयोर्महत ।। १८ ।।
निचिक्षिपे नृपेणाशु निगूढे दृढशिक्षितः ।
गणाजीकोथ मोत्याजी रवलेकर मामकौ ।। १९ ।।
तावप्यतिबल तैस्तैः समयोचितभूषणैः ।
भूषयित्वा ददौ सार्धं संमतैः सैनिकैः सह ।। २० ।।

तो अत्यंत हुशार वकील जवळ आल्यावर मग सर्व कार्यनिपुण अशा अनाजी पण्डितास सैन्यासह वेगाने स्वारीवर पाठविले. त्याच्या मागोमागच कोंडाजीस पालखी इत्यादी देऊन नाना प्रकारच्या वस्त्रांनी अलंकृत केले, त्याच्या दोन्ही हातांत दोन मोठी सोन्याची कडीं महाराजांनी घातली व त्यास गुप्त सल्लामसलत देऊन पाठवले. गणाजी आणि मोत्याजी रवलेकर मामा ह्या अति बलाढ्य सेनापतीसही त्यावेळी उचित अशा सर्व भूषणांनी भूषित करून निवडक सैनिकांसह त्यांच्याबरोबर दिले. (१६, १७, १८, १९ व २०,)

वन्दित्वा ते पदद्वंद्वं नृपतेः प्रस्थितास्त्रयः ।।
मौनेनैव ततस्तेऽमी शमवृक्षस्य पल्लवैः ।। २१ ।।
उत्तंसितशिरस्त्राणाः प्रदक्षिणमथो ययुः ।
यावद्राजापुरे गत्वा श्रमिदानाजपण्डितैः ।।२२।।
दिनत्रयं पुरो गत्वा साध्यासाध्यविचारणम ।
चारमुख्यमुखात्पूर्ण श्रुत्वा तूर्ण विचार्यते ।। २३ ।।
तावदेतेऽपि संयाताः तत्क्षणात् क्षणदामुखे ।
संभूय सम्यक तैः सर्वैर्मालानिःश्रेणिसाधकान् ।।२४।।
शार्दूलनखवल्लोहनिर्मितैनखरैर्युतान् ।।
गोधाधरान् कोलधरान् वलीमुखशिलीमुखान् ।। २५ ।।
तांस्तानाहूय तैः सार्धं कृतपूर्वावलोकनैः ।।
सावधानतया रात्रौ प्रययुः साधनोद्ववाः ।। २६ ।।

ते तिघे महाराजांच्या पाया पडून निघाले ते अगदी मुकाट्याने शमीवृक्षाच्या पल्लवान आपली शिरस्त्राणे अलंकृत करून त्या वृक्षास उजवी घालून गेले. राजश्री अनाजी पण्डित राजपुरी तीन दिवस आधीं जाऊन हेरांच्या मुख्यांच्या तोंडून पूर्ण बातमी ऐकून साध्यासाध्य गोष्टींचा जो ताबडतोब विचार करतात तोच हे तिघे रात्रीच्या तोंडास (सुमारास) तेथे जाऊन पोहोचले. त्या सर्वांनी एकत्र जमून दोरांच्या शिड्या बाळगणारे, वाघनखवाले, घोरपडवाले, मेखावाले, वलीमुख शिलीमुखवाले (तीक्ष्ण दांत असलेल्यांस) ह्या सर्वांस बोलाविले. त्या लोकांनी आधीच बारीक टेहळणी करून ठेवली होती. तेव्हां त्यांच्या बरोबर ते सावधपणे रात्री चाल करून गेले. (२१, २२, २३, २४, २५ व २६.)

आनाजीपण्डितैस्तेषां पश्चाद्भागे महावने ।
निलीय सेनया सार्धं पृष्ठरक्षतया स्थितम् ।। २७ ।।

आणि स्वतः अनाजीपण्डित हे पिछाडीचे रक्षण करण्यासाठी म्हणून सैन्यासह त्यांच्या पाठीमागे मोठ्या अरण्यांत लपून राहिले. (२७.)

सूचीभेद्यं तमस्तावन्मुष्टिग्राह्यतया स्थितम् ।।
एक एव हि लोकेऽस्मिन्नद्वितीयतया पुनः ।।२८।।
संभवामति सर्वेषामुत्पन्ना ज्ञाति १ यन्मतिः ।।
पतिकार्यसहायास्ते सहायाला उपत्यकाम ।। २९ ।।
प्राप्ताः प्रपातनिकटं संकटेन महीयसा ।।
ऊर्ध्वमालाकयामासुः लोकालोकमिवोच्छूतम ।। ३०।।

त्यावेळी इतका दाट अंधार पसरला होता की, जणू काय तो मुठींत धरण्याजोगा होता. मी तेवढाचे (एकटाच) या लोकी अद्वितीय पुरुष म्हणून पुनः जन्म घेईन अशी सर्वांची बुद्धी झाली. (अशी प्रत्येकास बुद्धी होऊन अद्वितीय पराक्रम करण्याची अहमहमिका झाली.) धन्याच्या कामी साह्य करणारे ते मोठ्या मेटाकुटीने व प्रयासाने पन्हाळगडाच्या पायथ्यांशी पोंचले व तुटलेल्या कड्याजवळ आले व त्यांनी लोकालोक पर्वताप्रमाणे उंच अशा त्या कड्याकडे वर पाहिले. (२८, २९ व ३०.) ।

अभवन्हतगर्वास्ते सर्वत्रछ्रायदर्शनात ।।
ततस्तैः साधनयुक्ताः कृतव्यत्यासनामकाः ।। ३१ ।।
हस्ताहस्तिकदानादि दत्वाऽध्यारुरुस्तदा ।
मौनेनाधित्यकायामप्यध्यारूढा दृढायुधाः ।। ३२ ।।

तेव्हां सर्वत्र उंचीच उंची पाहून त्यांचा गर्व नाहीसा झाला. नंतर ते चढण्याची साधने घेऊन व नांवाची उलटपालट करून (नावे बदलून) ते एकमेकांस हाताला हात देऊन वर चढले. हातांत दृढ आयुधे असलेले ते मुकाट्याने पठारावर सुद्धां चढले. (३१ व ३२.)

तूर्णकर्णालवाद्यस्य शब्दं चक्रुः समन्ततः ।।
ततस्तेनातिशब्देन व्याप्तमासीदिशातरम् ।। ३३ ।।

आणि लगेच चोहों बाजूस कर्णा फुंकला तेव्हा त्या प्रचंड ध्वनीने दिशा व्यापून टाकल्या. (३३.)

अध्यक्षोऽभूद्यामिकानां बाबूखानेतिनामकः ।
तेनोक्तं केन केनेदं वाद्यमापाद्यते भृशम् ।। ३४ ।।

बाबूखान नांवाचा पाहारेकऱ्यांचा नाईक होता. त्याने विचारले, अरें, कोणरे जोराने वाद्य वाजवितो? म (३४.) ।

यामिकैः सामिसंलग्ननिद्राकुलितलोचनैः।
उन्मुच्य वदनाद्वस्त्रं शस्त्राण्यादाय धावितम ।। ३५ ।।

पहारेकऱ्यांच्या डोळ्यांवर निद्रेची झापड येऊन ते अर्धवट मिटलेले होते. ते तोंडावरचे पांघरूण काढून टाकून शस्त्रे हाती घेऊन धावले. (३५.)

दृष्ट्वा पदातिपृतना धावमानांततस्ततः ।
नागराणां ततः शब्दः क्षुब्धसागरसंनिभः ।। ३६।।
संजातः त्रासजनकः शनकैयनशे दिशः ।
ततो मुद्राधिपो मुख्यः कौक्षयकसहायवान् ।। ३७।।
कक्षासु रक्षितैर्दौस्ताक्ष्यैः सर्पष्विवापतत ।
समायान्तमतिक्रोधात् प्रसिद्ध युद्धदुर्मदस ।। ३८ ।।
कौंडाजी खड्गमुद्यम्य तमेवाभिमुखोऽभवत् ।

पायदळांतील सैन्य इकडे तिकडे धावतांना पाहून नगरवासियांचा खवळलेल्या समुद्रासारखा भयंकर आरडाओरड उत्पन्न होऊन त्याने दशदिशा व्यापल्या. तेव्हा मुख्य किल्लेदार (सुभेदार) हातांत तरवार घेऊन, गरूड सापावर झडप घालतो. त्याप्रमाणे आंतील दालनांत तयार ठेवलेल्या दक्ष लोकांसह धाऊन आला. त्या सरशी कोंडाजी तरवार उगारून त्या प्रख्यात व अति त्वेषाने येणाऱ्या युद्धोन्मत्त किल्लेदारावर उलट चालून गेला. (३६, ३७, ३८ ३ ३८०)

सैनिकाः सैनिकैः सार्धमायुधैर्युद्धकोविदाः ।। ३९ ।।
रे गृहाण गृहाणेति युयुधुः शब्दपूर्वकम ।
मुद्रधिकारिणा केचित् क्षुद्रा निःशस्त्रशपाणिना ।। ४० ।।
पातिताः प्रथमं तावत्कोंडाजी रणपाण्डितः ।
स्वेन चण्डासिना तस्य मुण्डं कायादखण्डयत ।। ४१ ।।

युद्धनिष्णात असे सैनिक, 'धरा रे धरा', असे ओरडून आयुधे घेऊन सैनिकांशी लढू लागले. त्या खड्गधारी किल्लेदाराने प्रथम कांही क्षुद्र सैनिकांना मारले, तेव्हां रणपटु कोंडाजीने आपल्या तीक्ष्ण तरवारीने त्याचे मुंडके घडापासून कापून टाकले. (३९ पूर्ण, ४० व ४१)

तावतचण्डांशुकिरणैः राहूत्कै? गैरारक्तैर्व्योममण्डलम ।
स्पष्टमासीदहो तत्र किंचिदुत्प्रेक्ष्यते परम् ।। ४२ ।।
जीवोऽपि तत्तुरुप्कस्य देहवत्क्रोधमूर्छितः ।।
कैठाद्वहिरवागत्य सूर्यस्तेनाहतो हृदि ।। ४३ ।।

इतक्यांत आरक्त सूर्यकिरणांच्या योगें आकाश स्वच्छ दिसू लागले. त्यावर अशा एक कल्पना करू की, त्या तुरूकांचा (पठाणाचा) प्राण देखील देहाप्रमाणे क्रोधमूर्च्छित होऊन जणू काय कंठातून बाहेर पडून त्याने सूर्याच्या हृदयावर प्रहार केला. (४२ व ४३)

तस्मात् तद्रक्तसंमिश्रास्तमिस्रान्ते रवेः कराः ।
शनैः शनैर्बहियताः खगाः क्रोशसमन्विताः ।। १४ ।।

त्यामुळे याच्या किल्लेदाराच्या रक्ताने रवीचे किरण संमिश्रित होऊन रात्रीच्या शेवटी हळू हळू आकाशांत कोसभर बाहेर गेले व पक्षीसुद्धा किलकिलाट करीत बाहेर पडू लागले. (४४)

ततः समभवद्युद्धं यत्र यत्र जनैः सह ।।
तत्रत्यो विस्तरस्तावद्वक्तुमेव न पार्यते ।। ४५ ।।

त्यानंतर लोकांशी ठिकठिकाणी ज्या ज्या चकमकी उडाल्या त्या सर्वांचे सविस्तर वर्णन करणे माझ्या शक्तीच्या बाहेर आहे. (४५.)

नागोजीपंडितस्तावद रावं शुश्राव भैरवम् ।
सजवं विव्हलतया द्वारपालं स्म पृच्छति ।। ४६।।

इतक्यांत नागोजी पंडिताने ही भयंकर आरडा ओरड ऐकली, तेव्हां गोंधळून जाऊन द्वारपालास तो घाईघाईने विचारू लागला की, (४६.)

किमिदं किमिदं पश्य कस्य कोलाहलो महान् ।।
तावत्पदातयः केचित महाशद्बान्विता जवात् ।। ४७ ।।
चुक्रशुखरमासाद्य निश्र्वासाथूरितोदराः ।।
सुप्तोऽसि किमहो ब्रम्हन गृहीतः पर्वतः किल ।। ४८ ।।

अरे हे काय आहे? हा मोठा आरडा ओरडा कसला कोणाचा आहे ते पहा. इतक्यांत कांहीं शिपाई मोठ्याने ओरडत व धापा टाकीत वेगाने

दरवाज्याजवळ येऊन हाका मारू लागले. अहो ब्राह्मण महाराज आपण कसे निजला आहा ! हा गड खरोखर शत्रूच्या हातांत गेला. (४७ व ४८.)

राजद्वाराग्रतस्ताव मुद्राधिपतिरप्यसौ ।
पातितोऽस्ति शिरःस्थित्याः किमिदानीं विचार्यते ।। ४९ ।।

प्रत्यक्ष राजवाड्याच्या दरवाज्यासमोर सुभेदार देखील ठार मारला गेला. आतां शीरसलामतीचा विचार कसला करतां ! म (४९.)

एवं वदत्स्वहो तेषु किं कर्तव्यमिति स्थितम् ।
गणाजी स्वगणैस्तावत्तद्गहाभिमुखो ययौ ।। ५० ।।

असे ते बोलत असतां तो काय करावे असा विचार करीत उभा राहिला. इतक्यांत गणाजी आपल्या लोकांसह त्याच्या घराकडे चालून गेला (५०.)

तमायान्तं समालोक्य स्वसैन्यपरिवारितम् ।।
झटत्यन्यविमार्गेण जीवमात्रेण निर्गतः ।। ५१ ।।

त्याला सैन्यासह येतांना पाहून तो झटकन दुसऱ्या आड मार्गानें केवळ जीव घेऊन पळून गेला. (५१.)

तत्पश्चान्मौक्तिकाख्योऽसौ तृतीयस्तत्पलायनम ।
ज्ञात्वा संशोधयामास तावदन्येऽधिकारिणः ।। ५२ ।।

त्यानंतर मोत्याजी नांवाचा तिसरा एक अधिकारी पळून गेल्याचे समजतांच गणाजी त्याचा शोध करू लागला.

धृत्वा धृत्वा समानीतास्तैस्तैः सर्व निवेदितम् ।।
ततो मुख्यगृह राज्ञामन्येषां चाधिकारिणीम ।। ५३।।

संमृग्यादौ ततः पश्याचात प्रकारे च समन्ततः ।।

प्रविलोक्य प्रतिद्वारि स्थापिताः स्वस्वरक्षकाः ।।५४ ।।

इतक्यांत दुसऱ्या अधिकाऱ्यांना धरधरून पकडून आणले. त्या अधीकारी लोकांनी सर्व माहिती दिली. तेव्हां राजाचा मुख्य वाडा आणि दुसऱ्या अधिकाऱ्यांचे वाडे प्रथम शोधले, आणि मग तटावर व सर्व बाजूंस बारकाईने निरीक्षण करून प्रत्येक दरवाज्यावर आपआपले रक्षक ठेवले. (५३ व ५४.)

ततः स्वजवमास्थाय महाराजाय सत्वरम ।।

पत्रं विलिलिखुस्तावदानाजीपंडितर प ।। ५५ ।।

घोविन्वा वै समायातं हर्षनिर्भरमासैः ।।

ततो दिनद्वयेनैव प्रविष्टः पत्रहारकः ।। ५६ ।।

नंतर त्यांनी त्वरा करून महाराजांना लागलीच पत्र लिहिले. आनाजी पंडित देखील हर्षभरित होऊन धांवत आले. पुढे दोन दिवसांनी तो पत्र नेणारा जासूद पोंचला; (५५ व ५६.)

गृहीतोऽसौ पनालाख्यो दुर्ग इत्युच्चकैर्वदन ।

ददौ पत्रं ततः पश्चात् जानुभ्यामवनीं गतः ।। ५७ ।।

व पन्हाळगड घेतला, असे मोठ्याने बोलून महाराजांस पत्र दिले आणि गुढघे टेकून प्रणाम केला. (५७.)

महाराजस्ततस्तूर्ण वराहाणां शतं तदा ।

सशर्करं करे कृत्वा तन्मुखाम्भोरुहेऽक्षिपत् ।। ५८ ।।

तेव्हां महाराजांनी लगेच शंभर होन (वराह) व साखर हातांत घेऊन त्याला ते (होन) दिले व त्याच्या तोंडांत साखर घातली. (५८.)

ततः संफुल्लनयनः संतोषादविलंबतः ।।

दुंदुभिध्वानसहितान्यग्नियंत्राण्यवासृजत् ।। ५९ ।।

नंतर आनंदाने नेत्र प्रफुल्ल होऊन त्यांनी लागलीच नगारे वाजविण्यास व तोफा सोडण्यास आज्ञा केली. (५९.)

विजयपुरमिदानीं गृह्यतेऽस्माभिरिन्थम समजनि निनदोऽग्रे सुंदुंदभेः संभ्रमेण । अवदादिव हि तावत्कंदरासंनिविष्ट

प्रतिनिनदमिषात्क पर्वतोऽप्येवमुच्चैः ।।६० ।।

''आता आम्ही विजापुर घेतों'' असा दुंदुभीचा ध्वनि प्रथम निघाला, इतक्यांत गुहेत शिरलेल्या प्रतिध्वनीच्या मिषानें तो गड सुद्धा मोठ्याने जणू काय असेंच बोलला. (६०.)

***

अध्याय चवथा

अथान्यस्मिन दिने तावद्राजा राजीवलोचनः ।।
सुवर्णसूत्रसंवीतैर्ननावखैरलंकृतः ।। १ ।।

नंतर दुसऱ्याच दिवशी कमलाप्रमाणे ज्यांचे नेत्र आहेत असे महाराज अंगात नाना प्रकारची जरतारी वस्त्रे घालून (१.)

सचिवैः सैनिकैः सार्ध तं गिरिं द्रष्टुमाययौ ।
दधिदूर्वादिकं दृष्टवा सवत्सां धेनुमस्पृशत् ।। २।।
जयघोषवतोन्विप्रान नमस्कृत्य यथाविधि।
सुखासने समारूढः तावदभ्यर्णमागतः ।। ३ ।।
अंभोभिः पूर्णकुंभोग्रे सुवासिन्याहृतस्तदा ।।
तद्दक्षिणमथो कृत्वा सर्वलोकनमस्कृतः ।। ४ ।।

सचिव आणि सेनापति यांसह तो गड पहावयास निघाले. दहीं, दुर्वा इत्यादि पाहून, सवत्स धेनूस स्पर्श करून जयघोष करणाऱ्या ब्राह्मणांस यथाविधी नमस्कार करून सुखकारक अशा आसनावर आरूढ झाले. इतक्यांत पाण्याने भरलेली घागर घेऊन सुवासिनी समोर आली. तिला उजवी घालून सर्व लोकांचे नमस्कार घेत घेत (२, ३ व ४,)

आतपत्रकृतच्छायः पर्वताग्रावातरत ।
पंचवाडपुरे श्रीमदंबायाश्चरणांबुजम ।।५।।

रायगडावरून खाली उतरले. उन्हाचे निवारण करण्यासाठी त्यांच्या डोक्यावर छत्र धरण्यांत आली होती. पंचवाड पुरांत (पांचाडांत) श्री अंबाबाईच्या पायांपडून, (५.)

नत्वाशिषो गृहीत्वास्याः पुनर्नत्वा कृतांजलिः ।
प्रयाणोन्मुख दधे स तदा नृपकेसरी ।। ६।।

तिचा आशीर्वाद घेतला, पुनः लवून हात जोडून महाराज निघण्यास सज्ज झाले. (६.)

वेत्रपाणिशतेनाग्रे नामग्रहणपूर्वकम् ।
नमस्कारमयं रः प्रकरोति विलोक्यताम् ।। ७ ।।

पुढे उभे असणाऱ्या शेकडो भालदारांनी, ' हा वार आपणांस नमस्कार करतो आहे, ह्याच्याकडे पहावे.' (७.)

एवं निवेदिता सर्वांस्तच्छूरान् प्रीतिपूर्वकम ।
तांबूलं दापयित्वाग्रे धावमानान पुरस्सरान् ।। ८ ।।

असे नामोच्चार पूर्वक सांगितल्यावर त्या सर्व शूरवीरांना विडे देवविले आणि पुढे धावणारे अग्रदूत, (८.)

नासीरस्थानपि तथा पताकाभिरलंकृतान् ।।
वाजिवहान दन्तिवाहान् हेषाबंहितसंकुलान् ।।९।।

तांस्तान् प्रणमतान्मार्गे यथास्थानमवस्थितान।
स्वहस्तेन यथामानं संभाव्योभयपार्श्वयोः ।। १० ।।
निःशस्त्रखेटककरैः परितः परिवारितान् ।
प्रतस्थे तूर्यनिषैर्दोषयन् सर्वतो दिशः ।। ११ ।।

निशाणानीं शोभणारे अघाडींतील लोक घोड्यांच्या खिंकाळण्याने व हत्तींच्या चीत्काराने गजबजलेले घोडेस्वार व हत्तीस्वार हे आपआपल्या योग्य स्थानी उभे राहून लवून नमस्कार करीत असतां व हातांत ढाल तरवार असणाऱ्या शिपायांकडून दोन्ही बाजूस सारले जात असतां महाराज त्या सर्वांचा ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणे स्वहस्ताने सत्कार करून तुताऱ्यांच्याध्वनीने सर्व दिशा दुमदुमवीत पुढे निघाले. (९, १० व ११.)

वाजिराजिमुखोत्खातधूलीपट्टलपाटलाम् ।
पीतवस्त्रातपत्रस्य रविस्तत्र छवि दधौ ।।१२।।

तेव्हां अश्वपंक्तीच्या खुरांनी उडविलेल्या धुळीच्या लोटांमुळे पिवळ्या कापडाच्या छत्राप्रमाणे सूर्याची प्रभा दिसू लागली. (१२.)

ततस्तीरे तु सावित्र्या महानगरोत्तमे ।।
नालिकेरेक्षुपनसखजूराम्रातकैर्वृते ।। १३ ।।
दाडिम्याक्रोटकदलीद्राक्षामण्डपसंकुले ।
मध्यान्हमनयद्राजा तालव्यजनीजितः ।। १४ ।।

नंतर सावित्री नदीच्या कांठी नारळी, ऊस, फणस, खजूर, आंबाडा यांनी व्यास, व डाळींबी, अक्रोड, केळी आणि द्राक्षमंडप यांची गर्दी असलेल्या महार्ह (महाड) नांवाच्या उत्तम नगरांत, ज्यांच्यावर ताडाच्या पंख्यांनीं वारा घालण्यात येत होता, अशा महाराजांनी दुपार घालविली. (१३ व १४.)

जातीचंपकमालत्याद्यनेककुसुमैर्नवैः ।
उत्तंसमालावलयान्याजघुः सैनिकाअपि ।।१५।।

सैनिकांनी देखील जाई, चांपा, चमेली इत्यादि अनेक प्रकारच्या ताज्या फुलांचे हार, तुरे व गजरे घेतले (१५.)

ततः पौलस्त्यनगरे परमानन्दनन्दितैः ।।
रसस्तुपंचदशाभिः कवीन्द्रर्वधितैर्द्विजैः ।। १६ ।।
गीयमानं यशः स्वयं श्रुत्वा श्रुत्वा शनैः शनैः ।
नरयानादवातीर्य चतुःशालं मनोरमम् ।। १७ ।।
मन्दिरात्र्यं समासाद्य एक एवाग्रगोऽभवत ।
गोस्वामिचरणद्वंद्वं नन्दयामास मन्दिरे ।। १८ ।।

पुढे पौलस्त्य नगरांत (पोलादपुरांत) अत्यंत आनंदित झालेल्या पंधरा अवनी व त्यांनी वाढविलेल्या ब्राह्मणांनी मोठ्या प्रेमाने (आवडीने) गायलेली आपली कीर्ति सावकाशपणे ऐकत ऐकत महाराज पालखीतून उतरले आमि चौसोपी, सुंदर व उत्तम मंदिराजवळ

पोचल्यावर पुढे एकटेच आंत गेले व मंदिरांत गोस्वामींच्या (श्री समर्थरामदासांच्या) पायांवर डोके ठेवले. (१६, १७ व १८.)

गोस्वामी च ततस्तस्य हस्तं विन्यस्य मस्तके ।

पूर्णसाम्राज्यदात्रीभिराशीभिः पर्यतोषयत् ।। १९ ।।

नंतर गोस्वामीनी (श्री समर्थ रामदासांनी) त्यांच्या (श्री शिवाजीमहाराजांच्या) मस्तकावर हात ठेवून, 'पूर्ण साम्राज्य प्राप्त होवो', असा आशीर्वाद देऊन त्यांस संतुष्ट केले. (१९.)

यथोषितानि वस्त्राणि रत्नानि विविधान्यपि ।

विन्यस्याग्रे स नृपतिर्नमस्कृत्य पुनः पुनः ।। २० ।।

प्रययौ सैनिकैः सार्ध पौरानन्दयञ्छनैः ।।

त्यांच्या (समर्थांच्या) पुढे उचित अशी वस्त्रे व विविध रत्नहि महाराजांनी ठेविली आणि पुनः पुनः नमस्कार करून त्या नगरांतील लोकांना आनंदवीत सैनिकांसह सावकाश पुढे चालले. (२० व २०।।.)

ततः श्रीमत्प्रतापाख्ये पर्वते पुष्पितमे ।। २१ ।।

पारे गिरा स्थितवात प्रेकारोच्छ्रायशोभिते ।

आरुरोह नृपस्तस्मिन्नात्तैः कतिपयैर्जनैः ।। २२ ।।

नंतर ज्याच्या वरील वृक्ष फुललेले होते व जो तंटाच्या उंचीमुळे भव्य देत होता अशा अवर्णनीय प्रतापगडावर विश्वासांतल्या अगदी थोड्या लोकांसह महाराज चढले. (२१ पूर्ण व २२.)

दूरे संस्थाप्य यानानि ततस्संत्यक्तपादुकः ।

आलोक्यायतनं देव्याः पद्यामेवान्वपद्यत ।। २३ ।।

वाहनें दूर ठेविली व मग देवीचे देऊळ पाहिल्याबरोबर जोडे काढून टाकून पायीच चालले. (२३.)

सौधं सुवर्णरुचिरैःस्तंभैर्गगनचुम्बाभः ।।

स्तंभितं हेमकुंभैश्च पताकाभिरलंकृतम ।। २४ ।।

ते देऊळ चुनेगची असून त्याचे खांब सोन्याच्या मुलाम्याने चकचकणारे व अत्यंत उंच होते. त्यांच्यावरील सुवर्ण घुमट व पताका यांनी त्यास शोभा आली होती. (२४.)

सौवर्णरौप्यफलकैः कपाटैर्दिक्चतुष्टये।

स्फुटं प्रतीयमानं यत सुरज्येष्ठमिवाननैः ।।२५।।

चारही दिशांस असणाऱ्या सोनेरी व रुपेरी झडपांच्या दारांतून ते (देऊळ) स्पष्ट दिसत होते व त्यास चतुराननाची उपमा साजत होती. (२५)

घंटामृदंगकाहाळदुन्दुभिध्वनिनादितम् ।

कालोचितमहापूजासंख्यावृत्तजनैर्वृतम् ।। २६ ।।

तें घंटा, मृदंग, नगारा (काहाळ) व दुंदुभी यांच्या ध्वनीने दुमदुमून गेले होते. योग्य समयीं होणाऱ्या महापूजेकरिता आलेल्या असंख्य लोकांनी व्यापून टाकले होते. (२६.)

एकत्र वेदशास्त्राणामध्यापकरवान्वितम् ।।

एकत्र वलभीसंस्थशुकैः केकिभिरुच्छिखैः ।। २७ ।।
सारिकाचटकैश्चापि कपोतैश्च निनादितम् ।।
पुरद्वारमहावेद्यामुच्छ्रितासनसंस्थितैः ।। २८ ।।
पुराणश्रवणायातैः व्याप्तं वर्णचतुष्टयैः ।
एकदेशेऽन्नसत्रस्य शालाभिरुपशोभते ।। २९।।
दर्शनायागतैश्चित्रे मुहुर्मुहुरवेक्षितम ।

त्यांत एकीकडे वेदशास्त्राध्यापकांचा घोष चालला होता. एकीकडे वळचणींत रहाणारे पोपट, पिसारा उभारलेले मोर, मैना, चिमण्या व पारवे यांच्या किलाकलाटाने गजबजून गेले होते. महाद्वाराच्या ओट्याबर उंच आसनावर बसलेल्या, पुराणश्रवणासाठी आलेल्या चारही वर्णांच्या लोकांनी ते व्यापलेले होते, अन्नछत्रांतील पाकशालानीं सुशोभित अशा एका सुंदर भागांत दर्शनासाठी आलेले लोक वारंवार अवलोकन करीत होते. (२७, २८, २९ व २९।।०)

वानरैः पक्षिभिश्चापि भक्षितार्थफलैर्वृतैः ।। ३० ।।
प्रांगणे कुत्रचिद्व्याप्ते बालैस्तदहग्रणोत्सुकैः ।।
महामंडपमालोक्य ततो देवीं व्यलोकयत ।। ३१ ।।
हेमरत्नमये पीठे तिष्ठन्त भक्तवत्सलाम् ।।
मञ्जीरयुग्मविलसद्वल्फुयुग्मपदांबुजाम ।। ३२ ।।

सभोंवतीं गराडा देणारे आणि फळे अर्धीमुर्धीच खाणारे वानर व पक्षी, तसेच ती घेण्याला टपलेली मुले यांनी व्याप्त अशा पटांगणांत महामंडप पाहून सुवर्णमय आसनावर (ओट्यावर) उभे असणाऱ्या व भक्तांवर प्रेम देवीचे दर्शन घेतले. तिच्या पायांत पैंजण लखलखत होते. (३० पूर्ण, ३१ व ३२)

स्फुरन्मणिप्रभायुक्तकटिसूत्रोपशोभिताम ।
रत्नकंकणकेयूरमुक्ताहारविराजिताम ।। ३३ ।।

कमरेत चमकणाऱ्या हिऱ्यांच्या प्रभेने युक्त असा कमरपट्टा झळकत होता, (हातांत) हिरेजडित कांकणे, (भुजांत) हिरेजडित बाजूबंद व (गळ्यांत) मोत्यांचा हार ही विराजत होती. (३३.)

अनर्घ्यरत्नयुक्ताभिर्मुद्रिकाभिरलंकृताम् ।।
पूर्णचंद्रार्कबिंबाभ्यां तुलिताभ्यामहर्निशम् ।। ३४ ।।
ताटकाभ्यां कर्णयुगे सौवर्णाभ्य विभूषिताम ।
प्रस्फुरन्मौक्तिकोदग्रमाणिक्यमाणिमण्डितैः ।। ३५ ।।
शीर्षपुष्पोच्छूतिरुखैरुत्तंसितशिरोरुहाम् ।।
आसीमसीमसीमन्तसिन्दूरद्रवमण्डिताम् ।। ३६।।

(बोटांत) अमूल्य रत्नखचित अंगठ्या चमकत होत्या, कानांत चन्द्रसूर्यांच्या पूर्ण बिंबांसारखीं सुवर्णकुडले झळकत होती, मोती, माणके व हिरेजडित डोक्यातल्या फुलांपासून निघणाऱ्या तेजःकिरणांनी तिचे केस खुलत होते, गांवाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत शेंदुराची रेषा शोभत होती. (३४, ३५.)

नासामुक्ताफलं यस्या दन्तोष्ठद्युतिपाटलम् ।
चे शुकास्यसंसक्तपक्कदाडिमबजताम ।। ३७।।

दांत ओठ यांच्या लालीने तांबूस छटा आलेले नाकांतील (नथीतील) मोती पोपटाच्या चोचीतील पिकलेल्या डाळिंबाच्या दाण्याप्रमाणे दिसत होते. (३७.)

शरच्चन्द्राननां मौरीं प्रोत्फुल्लकमलेक्षणाम् ।
आयुधाष्टकविस्पष्टमुष्टिसौष्ठवशोभितैः ।। ३८ ।।
बाहुभिर्भासमानांगी महिषासुरमर्दिनीम् ।
मांजिष्ठरागिसौवर्णवस्त्रयुग्मेन शोभिताम् ।। ३९ ।।

मुख शरदऋतूतील चंद्राप्रमाणे व नेत्र विकसित कमलाप्रमाणे दिसत होते, अष्टायुधे धारण करून ठळक दिसणाऱ्या शुभ्रमुठींच्या सौंदर्याने शोभणाया बाहूंनी ती प्रत्यक्ष महिषासुरमर्दिनीच भासत होती. लालरंगाची जरीची दोन वस्त्रे तिच्या अंगावर शोभत होती. (३८ व ३९.)

प्रस्तुतस्तनयुग्मोत्थदुग्धपानाय लोलुपे ।
वत्सलां भक्तवत्सेऽस्मिन् कामधेनुमिवस्थिताम् ।। ४० ।।

स्त्रवणाऱ्या स्तनांतून निघणारे दूध पिण्यास उत्सुक अशा भक्तरूपी वासरावर प्रेम करणारी ती देवी कामधेनूप्रमाणे उभी होती. (४०.)

प्रणम्य दंडवद भूमौ पुनः पुनर् तन्द्रितः ।।
प्रांज्ञलिः प्रांगणाग्रे प्रव्हास्तर्यग्व्यवस्थितः ।। ४१ ।।

तिला पुनः पुनः भूमीवर साष्टांग प्रणाम करून तिच्या पुढे हात जोडून । लवून महाराज बाजूस होऊन उभे राहिले. (४१.)

ततः पूजासमारम्भं चक्रं नृपतिसत्तमः ।।
पादाचमनीयादि मधुपर्क विधाय सः ।। ४२ ।।
पद्मामृतघटैः सम्यक स्नापयित्वा यथाविधि।
शुद्धोदकैश्च संस्त्राप्य क्षौम वस्त्रयुगं ददौ ।। ४३ ।।

व नंतर पूजेस आरंभ केला. पादपूजा आचमनादि मधुपर्क करून पंचामृताच्या (घागनी) घटांनी तिला चांगल्या रीतीनें यथाविधि स्नान घालून मग शुद्धोदकाचे स्नान घातलें व रेशमी वस्त्रांची जोडी दिली. (अंगावर घातली.) (४२ व ४३)

अलंकारान् हलिद्रां च कुंकुम कज्ञलं तथा ।
गन्धं पुष्पं च धूपं च दीपं खाद्य निवेद्य च ।। ४४ ।।
नैवेद्यं षड्रसैर्युक्तं विनिवेद्य ततः परम् ।
ताम्बूलं दक्षिणायुक्तं फलं नीराजनं ततः ।। ४५ ।।

नंतर अलंकार, हळदकुंकू, काजळ, गधफूल, धूपदीप व पंचखाद्य अर्पण केले. त्यानंतर षड्रसान्नयुक्त नैवेद्य अर्पण करून विडा, दक्षिणा, फळे दिली व आरती केली. (४४ व ४५.)

सुपुष्पाज्नलिना मन्त्रैः पुराणस्तवसंयुतैः ।
प्रदक्षिणनमस्कारैनृत्यगीतसमन्वितैः ।। ४६।।

क्षमापनैश्च सा देवी प्रसन्नवदनाम्बुजा ।
वरं दक्षिणहस्तेन ददौ द्रुतमभीप्सितम् ।। ४७ ।।

सुपुष्पांजलीने, पुराणोक्त स्तुतीयुक्त मंत्रांनी, नृत्यगतियुक्त प्रदक्षिणा व नमस्कार यांनी व (ज्ञाताज्ञात दोषांबद्दल) क्षमा मागण्याने प्रसन्न होऊन देवी इच्छिलेला वर उजव्या हाताने त्वरित देती झाली. (४६ व ४७.)

ततः प्रदक्षिणीकृत्य नमस्कृत्य पुनः पुनः ।।
मिथुनानां शतं पश्चात द्विजातीनामपूपुजत ।। ४८ ।।

नंतर प्रदक्षिणा घालून व पुनः पुनः नमस्कार करून ब्राह्मणांच्या शंभर दंपत्यांची महाराजानी पूजा केली. (४८.)।

नित्यदानविधं कृत्वा कविपंण्डिगोष्टिभिः ।।
संतुष्टः काव्यबधादि ऋण्वंस्तत्तद्रसाकुलः ।। ४९।।

नित्याचे दान करून, कवि व पण्डित यांच्या संभाषणाने आनंदित होत्साते, काव्यबंधादि ऐकत असतां निरनिराळ्या रसांनी तल्लीन झाले. (४९)

प्रसृष्टरुक्ममात्रस्थमन्नं षड्समिश्रितम ।।
भुत्क्वा वस्त्राणि गृण्हाति तावत्सूर्यास्तपर्वते ।। ५० ।।
अम्बुधेः शम्बरं तर्तमम्बरं दीर्घमत्यजत ।।
अथोदयगिरेमँध्रि सुधांशुरुदयं वहन् ।। ५१ ।।
देव्यग्रदीपमालाया मौलादीपतुला दधौ।।
नित्यगीतविनोदादिसपर्याकुशलैर्जनैः ।। ५२ ।।
प्रतिपर्वोत्सवस्तावत तत्र रात्रौ व्यजं भृत।
ततः प्रातः स नृपतिर्जगदम्बापदाम्बुजम् ।। ५३।।
पुनः पुनः प्रणम्याशु प्रतस्थे कृतगलः ।।
शैलैः कौलैः पनालेयैः पौरैराराद्विलोकितः ।। ५४ ।।

उज्वल सुवर्णाच्या ताटांत वाढले षड्रसात्मक अन्न सेवन करून, अंगात कपडे घालतात इतक्यांत दीर्घ (विस्तीर्ण) आकाश आक्रमून समुद्राचे जल तरुन जाण्यास सूर्य अस्तास गेला. नंतर उदयाचलावर आलेला चंद्र देवीसमोरील दीपमाळेच्या शिखरावरील दिव्याप्रमाणे दिसू लागला. नृत्य गीत इशारे प्रकारच्या सेवेमुळेच कुशल अशा लोकांमुळे त्या रात्री घटकाघटकी आनंदी आनंद उडाला. मग पहाटेस श्रीजगदंबेस पुनः पुनः वंदन करून व मंगल कृत्ये करून महाराज लवकर पुढे निघाले. पन्हाळगडावरील शिलवान कुलीन पौरजनांनी महाराज येत आहेत असे दुरून पाहिले. (२२,५१,५२,५३ व ५४.)

दिनत्रयेण शनैः सेनया सहित ययौ ।
ततो वाक्यविलेखाख्यैर्दत्तोपंतैः स्वशक्तितः ।। ५५ ।।
अधिकं हेमकुसुमैरर्चितः सर्वदेशजैः ।।
ततः स भूधरपति भूधराधिपतिर्नृपः ।।५६।।
पात्रं कृपाकटाक्षस्य गुरुच्छात्रमिवाकरोत् ।।

ततोऽग्रयायिभिर्भूत्यैः गोपुरस्थाः स्वरक्षकाः ।। ५७ ।।:।

सावधानतया तस्थुः सूचितागमनाः प्रभोः ।।

क्षणं दत्तेक्षणस्तस्मिन् प्रकारे द्वाःस्थसंनुतः ।।५८ ।।

ते तीन दिवसांनी स्वस्थपणे सेनेसह हळुहळू पोंचले. तेथे पोचल्यावर वाकेनवीस ही पदवी असलेल्या दत्तोपंतानी आपल्या शक्तीच्या बाहेर सर्व प्रांतांतील सोन्याची फुले उधळून त्यांचे स्वागत केले. मग ज्याप्रमाणे गुरु आपल्या शिष्यावर कृपादृष्टि टाकतो त्याप्रमाणे गडाचे स्वामी जे महाराज त्यांनी त्या गडावर कृपादृष्टी फेकली. नंतर महाराज आल्याचे भालदारांकडून कळतांच वेशीवरील त्यांचे रखवालदार सावधपणे उभे राहिले. त्या तटावर क्षणभर दृष्टी टाकून महाराज द्वारपालांकडून स्तुति केले जात असतां पुढे चालले. (५५... ५६, ५७, व ५८.)

प्रयातः पुरतस्तावत् पौरैर्जनपदैर्नरैः।।

उपायनसपर्याभिः पूजितः परितः स्थितैः ।। ५९।।

तेव्हां सभोंवतीं उभे असलेल्या नगरवासी व देशवासी लोकांनी नजराणे वगैरे देऊन त्यांचा सत्कार केला. (५९.)

वातायनगतैः स्त्रीणां वृन्दैरिन्दुमुखैः सुखम् ।

विलोकितः स्तुतिपदैर्बन्दिभिः संस्तुतो ययौ ।। ६० ।।

सुंदर स्त्रियांचे थवेच्या थवे खिडक्यांमधून त्यांच्याकडे आनंदाने पहात होते व भाट त्यांची स्तुती गात होते. (६०.)

अथ प्रदक्षिणेनासौ गच्छन मार्गेण भूपतिः ।

जम्बूखजूरपनसैराम्रैरक्षोटकैस्तथा ।। ६१ ।।

नारिकेलैश्च जंबीरैर्दाडिमैः कमुरैस्तथा।।

कपित्थैःकिंशुकैःप्लक्षैर्बिल्यैश्चंलदलैरपि ।। ६२ ।।

बदरीभिर्हमदुग्धैश्चंपकैर्बकुलैस्तथा ।।

कदलीभिः कंचनारैस्तथान्यैरपि शाखिभिः ।। ६३ ।।

मालतीभिर्मल्लिकाभिः सीमन्तीभिः समन्ततः ।

द्राक्षाभिर्मण्डपस्थाभिः कृतच्छायः स्थले स्थले ।। ६४ ।।

तेषां फलानि पुष्पाणि पलुवानि च मंजरीः।

जग्राहोपायनानव सविधोपनतानि सः ।। ६५ ।।

पुढे उजवीकडील मार्गाने जात असतां जांभूळ, खजूर, फणस, आंबा, अक्रोड, नारळ, महाळुंग, कवठ, पळस, पिंपरी, बेल, पिंपळ, बोर, उंबर, चंपा, बकुळ, केळी, कंचनार आणि दुसरे पुष्कळ वृक्ष, त्याचप्रमाणे चमेली, मोगरी व शेवंती व चोहोबाजूस मंडपावरील द्राक्षलता यांच्या छायेंतून जात असतां ठिकठिकाणी त्याची फळे, फुले, पल्लव व मंजिऱ्या ही जणू काय जवळ आलेल्या नजराण्याप्रमाणे त्यांनी घेतली. (६१,६२,६३,६४,६५.)

ततः सोमालये नाम्ना तटाके प्रस्फुटाम्बुजे ।
सारसैश्चक्रवाकैश्च हंसैः संशोभिते तटे ।।६६।।

पुढे सोमालय नावाचे विकसित कमलांनी युक्त असे तळे लागले. त्याचा कांठ सारस, चक्रवाक व हंसांनी शोभत होता. (६६.)

मत्स्यैः समुश्चलत्युत्थैः कच्छपैश्च तरंगिते।
वाताहतिचलांभोजोत्पतदभृंगकुलाकुले ।। ६७ ।।

माशांच्या व कासवाच्या योग ने त्याचे जल खळबळत असून त्यावर लय येत होत्या. वाऱ्याच्या तडाख्याने (सोसाट्याने) हलणाऱ्या कमळांमधून उडणाऱ्या भ्रमराच्या झुडींनी ते गजबजून गेले होते. (६७.)

मणिभंगाच्छसलिले श्रान्तविश्रान्तिकारिणि ।।
कर्पूरवापिकातोयमुपस्पृश्य ततः परम् ।। ६८ ।।
दत्तद्दष्टि समालक्ष्य देवतायतनं पुरः ।।
भोजभूपोप्तचपेयपुष्पैरपि मनोहरैः ।। ६९ ।।
देवतायतने तस्मिल्लक्षपूजां समादिशत ।।
पुण्याहवाचनं कृत्वा शैलारोह निमित्तकम ।। ७० ।।
नित्यदानं विधायासै द्विजाशर्वादमग्रहीत ।।
ततस्तस्मिन्नाधकृतैस्तत्तत्कायधुरंधरैः ।। ७१ ।।
तत्तन्निवेदितः का नियुक्तैर्युक्तसंग्रहे।
गंगायमुनयोः संज्ञ धारयन्तौ महत्तरौ ।। ७२ ।।
अंबराख्याननिलयौ कंठदम्नं समंततः।
खारीशतसहस्रेण धान्यनिपूरितौ ततः ।। ७३ ।।

त्याचे जल स्फटिकाप्रमाणे स्वच्छ व थकलेल्यांचा थकवा नाहीसा करणारे होते. तेथे कर्पूर वापीचे पाणी (कापराप्रमाणे गार व सुंगधी पाणी) पिऊन पुढे दृष्टी फेकली तेव्हां त्यांना समोर देऊळ दिसले. त्या देवळांत भोजराजांनी लावलेल्या चाफ्याच्या मनोहर फुलांनी लक्षपूजा करण्यास सांगितले. गडावरील आपल्या आगमनानिमित्त पुण्याहवाचन करून नित्यदान केले व ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले. नंतर योग्य रक्षणासाठी नेमलेल्या त्या त्या कार्याच्या मुख्यांनी (व्यवस्थापकांनीं) त्या त्या गोष्टीची माहिती दिली. नंतर 'गंगा' व 'यमुना' या नांवाची अंबरखाना म्हणून प्रसिद्ध असलेली धान्याची अत्यंत मोठी कोठारें लाखों खंडी धान्यांनी (गळ्यापर्यंत) काठोकाठ खचून भरलेली होती ती दाखविली. (६८, ६९, ७०, ७१, ७२, व ७३.)

प्राकारः पर्वतस्याग्रे पश्रचाद्भागेन पार्श्वयोः ।
सम्यग् निबद्धः सर्वत्र यत्र नीचतया स्थितः ।। ७४ ।।

गडाचा भाग जेथे जेथे सखल होता तेथे तेथे चारही बाजूस उत्तम रीतीने बांधलेला तट त्यांना दाखविला. (७४.)

अग्नियंत्राणि ? दावदिनवनेन्धनसंचयैः ।
गण्डशैलैः कारवेलैर्लोहकण्टकवेष्टितैः ।। ७५ ।।
लघुदीर्घोपलैबणैर्भिण्डपालासिपट्टिशैः ।
गुटिकास्त्रलहगोलैः शिलीमुखशरासनैः ।। ७६ ।।
तृणैः काष्ठेघृतस्तैलैर्लवणैर्मधुभिर्गुडैः ।। ।
अचलः परिपूर्णोऽयं विहितः प्रविलोक्यताम् ।। ७७ ।।

अग्नियंत्रे (तोफा) दारू इत्यादी नवीन इंधनाचा सांठा, मोठमोठ्या शिळा, लोहकंटकांनी वेष्टित अशीं कारल्यासारखी अत्रे, आखूड व लांबट असे फेकण्याचे दगड, बाण, गोफणी, तरवारी, भाले, गोटे, लोखंडी गोळे, धनुष्ये इत्यादी आयुधांनी तसेच गवत, सर्पण, तप, तेल, मीठ, मध (मोहाचे व द्राक्षांचे मद्य), गूळ इत्यादी पदार्थांच्या सामुग्रीने हा गड परिपूर्ण केलेला आहे तो महाराजांनी अवलोकावा असे सांगितले. (७५, ७६ व ७७,) । ।

ततस्तेभ्यो दापयित्वा यथार्ह पारितोषिकम् ।
मासमेकं स्थितं तत्र चक्रे वक्रतरे गिरौ ।। ७८ ।।

मग महाराजांनी त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणे पारितोषिके दिली व त्या अतिशय वक्र (वांकड्या) गडावर एक महिनाभर वास्तव्य केले. (७८.)

इति नरपतिसिंहस्तद्गिर्गव्हरस्थः ।
प्रकटनखनित्रोत्खातभूमेः समन्तात् । ।
धननिचयमहाद्गर्जयुक्तस्तदानी
मरिनकरगजास्ते दिग्गजानाश्रयीरन् ।। ७९ ।।

याप्रमाणे शिवाजीरूपी सिंहाने त्या गडरूपी गुहेत राहून तीक्ष्ण नखरूपी कुदळींनी खणलेल्या भूमीतून सर्व ठिकाणचा धनसंचय गर्जना करीत हरण केला. तेव्हां शत्रुरूपी हत्ती दिग्गजांच्या आश्रयास पळून गेले. (७९).

विजयपुरपतिस्तद्व्रजपाताभिघातप्रचुरतरकठोरारावमाकर्ण्य तूर्णम ।।
सचिवपदमदेनाप्युद्धतः क्रुद्धपूर्वान्
विकलमतिखवासः ख्यापयामास मुख्यान् ।।८०।।
इति शिवराजचरित्रे पनालग्रहणवर्णने चतुर्थोऽध्यायः ।।

वज्राघाताप्रमाणे दारुण अशी ती छाती विदीर्ण करून (दडपून) टाकणारी बातमी विजापुराचा धनी होऊन बसलेल्या खवासखानास ताबडतोब समजतांच तो सचिवपदाच्या मदानें उन्मत्त झाला होता तरी गोंधळून गेला व पूर्वी रागावलेल्या (नाराज झालेल्या) प्रमुख सरदारांस ती त्याने सांगितली. (८०).

चवथा अध्याय समाप्त.

****

अध्याय पांचवा

तस्ते बहलोलख्यप्रमुख मुख्यमंत्रिणः ।।
खवासाख्यं ह विख्याताः प्रोचुराक्षेपपूर्वकम् ।। १ ।।

तेव्हां बहलोलखानादी प्रख्यात मुख्य मंत्री खवासखानास निंदापूर्वक म्हणाले, (१)।

तवैवाविनयेनैतदत्याहितमुपस्थितम् ।
यतः सख्यस्य भंगेऽसौ शिवराज व्यवस्थितः ।। २ ।।

''तुझ्याच उद्धटपणामुळे हे संकट प्राप्त झाले आहे कारण त्या शिवाजीमहाराजांनी तह मोडण्याचा निश्चय केला आहे.'' (२)

त्वयैततु सर्वमाक्रान्त मेहता बुद्धिशालिना ।।
तस्मात्सर्वमिदं राष्ट्र दृश्यते मजनोन्मुखम ।। ३ ।।

तू मोठा बुद्धिमान असूनही हे सर्व तूच केलेंस म्हणून हे सर्व राज्य बुडण्याच्या बेतांत आले आहे. (३)

द्रष्टव्यं तावदेतस्य पित्रा शाहमहीभुजा ।
केन केनाप्युपायेन स्थलमतत्सुरिक्षतम् ।।४।।

ह्याचा (शिवाजीचा) बाप शहाजी याने हे स्थल कोणकोणत्या उपायांनी सुरक्षत राखले होते हे लक्षांत आण, (४)

अनेनैव हि ताम्राणामत्पातः शामितः स्थितः ।
वलया सागरस्येव प्रौद्यन्नक्रोर्मिमालिनः ।। ५ ।।

ज्याप्रमाणे मगरं व लाटा यांनी उसळणाच्या समुद्राला त्याचा किनारा थोपवून धरतो त्याप्रमाणे याच शहाजीने ताम्रांची (मोंगलांची) धाड थोपवून धरली होती. (जागच्या जागीच मारून काढली.) (५)

श्रूयते किल हिंदूनां शास्त्रे कैश्चिदुदाहृतम ।।
कल्की विष्णवताराणां दशमस्संभविष्यति ।। ६।।
छेत्स्यते तेन सर्वत्र व्याप्तं यावन मण्डलम ।
तस्यैव कलाकनस्तावदसावग्रे समागतः ।। ७ ।।
दूतो वै प्रतिभात्यस्मान्यतोऽस्मन्निधनोद्यतः ।

असे ऐक की, हिंदूंच्या पुराणात कलंकी नावाचा विष्णूचा दहावा अवतार होईल व तो सर्वत्र पसरलेल्या यवनांचा संहार करील असे वर्णिलेले आहे. त्याच कलंकीचा हा दूत पुढे आलेला आहे असे आम्हांस वाटते; कारण त्याने आमचा संहार आरंभलेला आहे. (६, ७ व ७।।)

अफजलोद्यास्तथास्माकं कियन्तो युद्धदुर्मदाः ।। ८ ।।
पातिताः पुनरप्यन्ये पात्यन्ते तेन नित्यशः ।
ताम्राणामप्यहो तावच्छास्तिखानो महत्तरः ।। ९ ।।

सपुत्रः सोऽपि निर्जित्य का दशां प्रापितः किल ।।

अन्येऽपि बहवो यातास्तथैवान्ये प्रयान्त्यमी ।। १० ।।

अफझलखान व दुसरे हि कितीतरी आमचे प्रचंड सेनापती त्याने ठार केले, आणखी दुसरेहि नित्यशः करीत आहे. अहो! मोंगलांचा (ताम्रांचा) अत्यंत श्रेष्ठ सेनापति जो शाइस्तेखान याचा सुद्धा मोड करून पुत्रासहित त्याची काय दशा केली बरे ! दुसरेहि पुष्कळ योद्धे गेले आणि हे दुसरे चालले आहेत. (८ पूर्ण, ९ व १०)

रणे तस्माज्जयं प्राप्य निर्गतः कोऽपि दृश्यते ।

केवलं जयसिंहस्य सजातीयतया मनाक ।। ११ ।।

पर्वतव्यत्ययात्तेन जयाभासः प्रदर्शितः ।।

आमिषं बडिशे बद्धा मत्स्यो यद्वन्निगृह्यते ।। १२ ।।

तद्वदेतेन तेषामप्याहृताः पर्वता अमी ।।

युद्धांत त्याच्यावर जय मिळवून बाहेर पडलेला असा कोण दिसतो आहे! किल्लयांची अदलाबदल करून केवळ जयसिंहाचा, तो जातभाई असल्यामुळे, थोडासा जय झाल्याचे त्याने कबूल केले. गळाला आमिश लावून ज्याप्रमाणे मासा पकडतात त्याचप्रमाणे त्याचे सुद्धा किल्ले याने काबीज केले. (११, १२ व १२।।)

तत्रैकस्मिन्हि सह्याद्रौ कदनं यदभूच्छृतम् ।। १३ ।।

यत्रायं मामको बंधुर्निबद्धो बंधुभिः सह ।

अन्येप्यहो महत्कर्म ? सिंहाद्यास्तद्रणांगणे ।। १४ ।।

एकशृंखलया बद्धाश्चरणे वारणा इव ।। ।

यस्मिन्नमरसिंहोऽपि मारितः सह सैनिकैः ।। १५ ।।

तेव्हा सह्याद्रीवरील एका किल्लयांत जी कत्तल झाली त्यांतच हा माझा भाऊ बंधूसह कैद करण्यांत आला.(मोहोकम) सिंहादि दुसऱ्यांही योध्यांना त्या रणांगणांत हत्तींप्रमाणे पायांमध्ये एकच शृंखलेने बांधून कैद केले, (हा त्याचा केवढा अचाट पराक्रम !) त्या कत्तलीत अमरसिंह देखील सैनिकांसह मारला गेला. (१३ पूर्ण, १४ व १५)

न बाबुरहामित्येवमुच्चैः क्रोश व्यवस्थितः ।।

ततोप्यधिकमेतस्मिन्निपेतुस्तस्य सैनिकाः ।। १६ ।।

प्रवदन्तो नबाबश्चेद्धंतव्यः शास्तिखानवत ।।

हास्यमायात्यहोस्माकमौदारामीयऽपौत्रकः ।। १७ ।।

शिखासूत्रं दर्शयित्वा स्वात्मानं प्रविमुक्तवान् ।।

सर्जाखानादयोप्यन्ये तर्जितास्तस्य सेनिकैः ।। १८ ।।

'मी बाबू (हिंदु) नव्हे.' (मी नबाब आहे) असे मोठमोठ्यानें ओरडून सांगत असतां, नबाब आहे तर शाइस्तेखानाप्रमाणे मारावा,' असे म्हणत ह्याच्यावर त्याच्या सैनिकांनी अधिक जोराचा हल्ला केला. आमच्या उदारामाच्या नातवाने शेंडी व जानवे दाखवून

आपली सुटका करून घेतली, हे हास्यास्पद नव्हे काय ! त्याच्या सैनिकांनीं सर्जाखानादि दुसऱ्यांही योध्यांना धमकी दिली; (१६, १७ व १८)

तेऽपि सत्यक्तशस्त्रास्त्राः किमन्यत्प्रोच्यतामिह ।।
मुलाहयाख्यस्य जितः कुंजरो जुनराहवे ।। १९ ।।

तेव्हां त्यांनी देखील शस्त्रास्त्रे टाकून दिली; तेव्हां तेथे आणखी दुसरें काय सांगावें ! जुन्नरच्या लढाईत मुल्लाहयखानाचा हत्ती ह्याने काबीज केला. (१९)

कथमेतादृशस्तावत्सख्यात् प्रच्यावितस्त्वया ।।
इदानीं गच्छ युध्यस्व किमस्मान् परिपृच्छसे ।।२०।।

असल्या ह्या शिवाजीला सल्ला मोडावयास कशी संधी दिलीस? आतां तू, स्वतः जा आणि त्याच्याशी युद्ध कर; आम्हांला कां विचारतोस ? (२०)

ततः प्रत्युतरं तेभ्यः खवासाख्योऽतिदुर्मनाः ।।
दीर्घमुष्णं च निश्वस्य ददौ प्रीतिकरं यथा ।। २१ ।।

यावर अत्यंत खिन्न झालेल्या खवासखानाने दीर्घ व कढत असा सुस्कार टाकून त्यांना संतोषकारक असे उत्तर दिले. (२१)

तथ्यमेव भवद्भिर्यत प्रोच्यतेऽ स्मत्प्रमादजम् ।।
कर्म तावत प्रवक्ष्यामि भवतां शासने स्थितः ।। २२।।
भवद्भिः पालितं पूर्वमिदानीमपि पाल्यताम् ।।
पातशाहोऽपि बालोऽसावर्पितः श्रीमतां करे ।।२३।।

'माझ्या चुकीमुळे जो अनर्थ झाला असे आपण म्हणतां तें सर्वस्व खरे आहे. पण आपल्या परवानगीने मी असे म्हणतों कीं, आपण पूर्वी जसे रक्षिले तसेच आतांहि रक्षण करावे, हा अल्पवयी बादशाहा देखील आपल्या हातात दिला आहे. (२२ व २३)

यथा राज्यमिदं सर्वं प्रभवेत्तद्विधीयताम् ।।
ततस्तेऽत्यंत संदुष्टा त्रस्तुष्टास्तद्वाक्यगौरवात् ।। २४।।

ज्याप्रकारे ह्या सर्व राज्याचा उत्कर्ष होईल तसे करावे. त्याच्या ह्या गौरवयुक्त भाषणाने ते अत्यत दुष्ट सरदार संतुष्ट झाले. (२४)

प्रोचुः प्रस्तुतकर्तव्ये प्रस्फुरब्दद्धयस्तदा ।।
बाहुलोलो ह्यसौ तावदस्मासु बलवत्तरः ।।२५।।

व उल्हासाने आतां पुढे काय करावे ते विचार सुचून सांगू लागले. * हा बहलोलखान आमच्या मध्ये सर्वांत बलिष्ठ आहे. (२५)

यं समाश्रित्य राज्यश्रीः स्थैर्य प्राप्य विराजते ।।
अनेनैव जितं सर्वे क्रूर कार्णाटमण्डलम ।। २६।।

ह्याच्याच सामर्थ्यामुळे राज्यलक्ष्मीला स्थैर्य प्राप्त होऊत ती शोभत आहे. ह्यानेच कडवा असा सर्व कर्नाटक प्रांत जिंकला. (२६)

अस्मै रत्नादिकं यद्यद गजवाजमृगादिषु ।।
उत्तमं नरनारीषु तत्तद्रूपैः प्रदीयत ।।२७।।

ह्याला रत्ने इत्यादी आणि हत्ती, घोडे, मृग इत्यादी तसेच नरनारी यांमध्ये जे जे उत्कृष्ट असेल ते ते राजांकडून देण्यात येते. (२७).

अस्माद्भयमनुप्राप्य शत्रवशस्त्रमुहुः ।।
तस्मात्सर्वमिदं कार्य एतस्मिन्नेव तिष्ठति ।।२८।।

ह्याच्याच भीतीनें शत्रु शस्त्रे टाकून देते झाले. म्हणून सगळ्या कार्याची भिस्त ह्याच्यावरच आहे. (२८)

अस्य सर्व हि कर्तृत्वमस्मद्राष्ट्रविवर्धकम ।
अतः संप्रायसेऽस्माभिः शिवराजभयादितैः ।। २९।।
विजापुरमिदं तस्माद रक्षणीयं भवेद्यदि ।।
विलंबस्तर्हि गंतव्य न विधेयस्त्वयाऽधुना ।। ३० ।।

ह्याचे सर्व कर्तृत्व आमच्या राष्ट्राचा उत्कर्ष करणारे आहे. यासाठी शिवाजी राजाच्या भीतीने गांगरून गेलेल्या आमची आपणास (बहलोलखानास) विनंती आहे की जर त्याच्यापासून (शिवाजीपासून) विजापूरचे रक्षण करावयाचे असेल तर तो स्वारीवर निघण्याच्या कामी आपण मुळीच विलंब करू नये, (२९ व ३०)

हस्तिद्वयं मदोन्मत्तं तथा वाजिचतुष्टयम् ।।
वस्त्राणि च महाहव शस्त्राणि विविधान्यपि ।। ३१ ।।
दत्वा प्रादापयंस्तमै तद्बालनृपतेः करात् ।।
पर्णान्युत्तमवर्णास्ते मंत्रिणस्तन्महीपतेः ।। ३२।।

असे म्हणून त्याला दोन मदोन्मत्त हत्ती, चार घोडे, मूल्यवान वस्त्रे, व नानाप्रकारची शस्त्रे अर्पून त्या मोठ्या लौकिकवान मंत्र्यांनी बादशाहाच्या हातून त्यास विडा देवविला. (३१ व ३२)

प्रणम्य शिरसा तस्मान्निःसृतः सोऽतिविश्रुत्ः ।।
कारयन दुंदुभेध्वानं प्रस्थानसमयोचितम् ।। ३३ ।।

तो अति विख्यात बहलोलखान मुजरा करून तेथून निघाला व प्रयाणसमयास उचित असे नगारे वाजविण्यास त्याने सांगितले. (३३)

ततः क्रोशत्रयोदूध्दै त्रिकोटनगरोत्तमम् ।
प्रस्थितः सेनया सार्धं धुन्वन्नत्युन्नत् धनुः ।। ३४ ।।

तेथून तीन कोसांच्या पलीकडे असलेल्या त्रिकोट (तिकोटें)नगराकडे मोठे धनुष्याचा टणत्कार करीत सैन्यासह निघाला. (३४)

कर्णालनिनदस्तावद दुंदुभिध्वनिमिश्रितः ।
गजाश्वरथनिर्दोषैर्ववर्धितः शत्रुतर्जनः ।। ३५ ।।

प्रबभौ तत्प्रयाणेऽसौ नभो विदलयन्निव ।

खुरक्षोदितमश्रवानां भूतलादनिलोत्थितम् ।। ३६।।

रेणुमण्डलमाकाशादवकाशं निराकरोत ।

यत्राभूत्सूर्यवहान धावनाय क्षमाऽक्षमा ।। ३७।।

कर्ण्यांच्या ध्वनींत नगाऱ्यांचा आवाज मिसळून त्यांत हत्ती, घोडे, रथ यांच्या ध्वनींची भर पडून शत्रूच्या पोटांत धडकी उत्पन्न करणारा तो प्रचंड ध्वनी जणू काय आकाश फोडून जात आहे असे त्याच्या प्रयाणाच्या वेळी भासले. घोड्यांच्या खुरांनी उत्पन्न झालेल्या व वायाच्या योगाने वर उडालेल्या धुळीच्या लाटांनीं आकाश पूर्ण भरून टाकले. जेथे सूर्याच्या घोड्यांना धावण्यास पृथ्वी उरली नाहीं, (३५, ३६ व ३७)

तस्यां प्रधावितैनतस्तद्धयैः कुत्रनिद्रविः ।

कवयस्तर्कयांचरित्थं ते चक्रवर्तिनः ।। ३८ ।।

अशा ठिकाणी जोराने धांवत गेलेल्या सूर्यांच्या घोड्यांनी सूर्य कोठे तरी नेऊन टाकला असे त्या कविश्रेष्ठांस वाटले.

एवं दिनद्वयेनैव उम्राणीग्रामसंनिधौ ।।

यावदागम्यते तावत्पत्रमप्येवमागतम् ।। ९ ।।

याप्रमाणे दोन दिवसानी उम्राणी गांवाजवळ येतांच त्याला पत्र आले कीं, (३९)

मुजाफरमलीकोऽसौ सर्जाखानसमन्वितः ।

रांगणीयनगप्रांते सेनया सह तिष्ठति ।। ४० ।।

'सर्जाखानासमवेत मुजाफर मलीक हा सैन्यासह रांगणे किल्याच्या आसपास आहे.'(४०)

असावतिबलोपेतः सहायार्थ निगृह्यताम् ।

तथा सिद्धीमसूदोऽसौ ह्यावन्या निवेशितः ।। ४१ ।।

करनोलकरस्तावदबदूला जिजोप्यसौ ।

तथा खिदिरखानोऽसौ पणिरित्यभिधीयते ।। ४२ ।।

नलदुर्गतलार्चागेव सेनापतित्रयी।।

क्रयाकर्तुमिवान्यद्धि सैन्यं देन्यविवर्जितम् ।।४३।।

एतैस्त्रिभिर्दिलेलाख्यखानेन सह शीघ्रतः ।

संगम्योकोचदानादि दत्वा सैन्यं प्रयाच्यताम् ।। ४४ ।।

त्या अत्यंत बलाढय सरदारास साह्यासाठी वश करून घ्यावा; त्याचप्रमाणे अवनीमध्ये स्थापिलेला सिद्दी मसूद, कर्नेलचा अब्दुलअजीज, नळदुर्गाच्या पायथ्याच्या अलीकडचा खिदिरखान ज्याला 'पणि' असे म्हणतात, असे तिघे सेनापती आहेत. दुसरेही अवसानदार सैन्य मदतीस मिळविण्यासाठी जणू काय विकत घेण्यासाठी ह्या तिघां सेनापतींनी दिलेरखानास लवकर भेटून लांचलुचपत देऊन सैन्य मागावे. (४१, ४२, ४३ व ४४)।

तत्सैन्यसहितास्सर्वे भवन्तोऽपि स्वसेनया।। बहलोलसहायार्थमायांत्वित्यपरार्थकः ।। ४५ ।।

चारोऽसौ प्रेषितस्तस्मात् सर्वै संभूय युक्तिः ।

जेतव्यः शत्रुरस्माकं शाहराजसुतः शिवः।। ४६।।

''त्या सैन्यांसह आपले स्वतःचे सैन्य घेऊन तुम्ही सर्वांनी बहलोलखानाच्या मदतीस यावे. म्हणून मुद्दाम ह्याच कामासाठी या हेरास पाठविले आहे. तेव्हां तुम्ही सर्व एकत्र मिळून आमचा शत्रु जो शहाजीराजाचा पुत्र शिवाजी त्याला युक्तीने जिंकावे.''(४२ ३ ४६)

ततः शिवमहीपालः तालाक्डानुजबुद्धीमान ।

कालस्तुरुकभूपानां पनालाधाःस्थितान्स्वकान्।।४७।।

प्रतापानन्दरायादीनाहूय रहसि स्थितः।

बहलोलो ह्ययं याति भवद्भिस्तच्च संश्रुतम ।। ४८।।

इकडे श्रीकृष्णाप्रमाणे बुद्धिमान व पठाणाचे राजांचा काळ अशा शिवाजी महाराजांनी पन्हाळगडाखाली असलेल्या आपल्या प्रतापराव, आनंदराव इत्यादी सेनापतींना बोलावून त्यांच्याशी एकांतांत गुप्त मसलत केली. हा बहलोलखान स्वारीवर निघाला आहे ते तुम्ही ऐकलें. (४७ व ४८)

कथमेतेन योद्धव्यमस्मदीयैस्त्वरान्वितैः ।

ततस्तेऽत्यन्तविनयदिदमूचुर्नुपोत्तमम् ।। ४९।।

निदेशकारिणो ह्यस्मात स्वामिभिः कि विचार्यते।

ह्यांच्याशी आपल्या लोकांनी कशा प्रकारे निकडीने युद्ध करावे? तेव्हा ते महाराजांस अत्यंत विनयाने म्हणाले की आम्ही आपल्या आज्ञेप्रमाणे वागणारे आहोत. म्हणून स्वामींनी आपला विचार काय तो सांगावा.'' (४९ व ४९।।)

राजोवाच ।।

श्रूयतां प्रोच्यते यावदल्पया स्वीयसेनया ।। ५० ।।

तिष्ठन्नास्ते ह्यदूरेऽसौ तावच् छीघ्रं निगृह्यताम् ।

यथा तृणलवोप्यस्य न गच्छेत् यत्रकुत्रचित् ।। ५ ।।

तथा दृढनिपातोऽस्मिन् सिंहवत् प्रविधीयताम् ।

ततो नृपनिदेशात्ते पर्णान्यादाय सैनिकाः ।।५२।।

प्रतापप्रमुखा जग्मुर्यावंतस्तत्र वै स्थिताः ।।

दिनद्वयेन निभृतं रात्रौ रात्रौ त्वरान्विताः ।। ५३।।

जलाशयोऽभवच्छत्रोस्तत्र सैन्यं कियद्भयैः ।।

विश्रान्तं कैश्चिदपरैः पश्चात्कैश्चित समागतम् ।।५४।। ।

महाराज म्हणाले :

''मी सांगतो ते ऐका, जोपर्यंत तो (बहलोलखान) स्वतःच थोड्या सैन्यासह जवळच आहे तोपर्यंत त्याला लवकर पकडावा. ज्या योगे ह्याची गवताची काडी सुद्धा कोठेही

तरी जाणार नाही अशा रीतीने ह्याच्यावर सिंहाप्रमाणे जोरदार हल्ला करावा.'' तेव्हां महाराजांच्या आज्ञेवरून प्रतापरावप्रभृती जेवढे म्हणून सेनापती तेथे होते ते विडे घेऊन निघाले; ते रातोरात गुप्तपणे त्वरेने दोन दिवसांनी शत्रूचा जलाशय (तलाव) जेथे होता तेथे पोचले; काहीं घोडेस्वारांनी विश्रांती घेतली. त्यांच्या मागून काहीं सैनिक येऊन त्यांस मिळाले. (५० पूर्ण, ५१, ५२, ५३ व ५४)

ततः सर्वैरनेकत्र स्थित्वा शत्रोः समंततः ।
दूरादेव महत्सैन्यं चतुर्दिसुविलोकितम् ।। ५५ ।।

नंतर ते सर्व शत्रूच्या चोहोबाजूंस निरनिराळ्या ठिकाणी राहिले व दुरून त्यांना चारहि दिशांस मोठे सैन्य दिसले. (५५)।

ततः सर्वैर्विचार्यादौ कैश्चिदुद्धो जलाशयः ।
सिद्धीहिलालखानेन ततूसैन्यस्याग्रतः स्थितम् ।। ५६ ।।

मग सर्वांनी आरंभी विचार करून त्या जलाशयास (तलावास) वेढा दिला. सिद्द हिलालखान त्या सैन्याच्या अघाडीस राहिला होता. (५६)

पश्चाद्विठोजिशिंदाऽसौ क्रोशमात्रादपस्थितः ।।
कृष्णाजीभास्करस्तावत्तथा विठ्ठलपीलद्या ।। ५७ ।।
पार्श्वयार्वैरिसेनायाः सम्यक सज्ञतया स्थितौ ।।
परितः पर्यटन्नासीद विसोबल्लाळनामकः ।। ५८ ।।

त्याच्यामागे फक्त एक कोसावर विठोजी शिंदा राहिला. कृष्णाजी भास्कर आणि विठ्ठल पिलद्या (पिलदेव) हे दोघे चांगल्या तयारीने शत्रुसैन्याच्या दोनही बलगांवर राहिले. विसों बल्लाळ नांवाचा सेनापति सभोंवतीं । घिरट्या घालीत राहिला. (५७ व ५८)

तावदज्ञातमेवासीदभिः करिमध्यगैः ।।
नीरपानाय निर्यात वीरगुप्तो गजव्रजः ।। ५९।।
ततस्तैः पृष्ठतो दृष्टं वेष्ठितं कटकं परैः ।
तावत प्रतापराजोऽसौ प्रताप इव मूर्तिमान ।। १० ।।
धावदश्रवसहस्रेण प्रलयाग्निरिवागतः ।
प्रोच्छलदूधूलिधूम्रस्य पश्चात् कृत्वा कदंबकम् ।। ६१ ।।

तोपर्यंत हत्तींच्या मध्यभागी असलेल्या शत्रुसैन्यास कांहींच समजले नाहीं; जेव्हा वीरांच्या रक्षणाखाली हत्ती पाणी पिण्यासाठी बाहेर पडले, तेव्हां पाठीमागून आपले सैन्य शत्रूनी वेढले आहे असे त्यांनी पाहिले. इतक्यांत प्रतापाची जणू काय मूर्तीच असा तो प्रतापराव दौडणाया हजार घोडेस्वांनिशीं वर उडणाच्या धुलिरूपी धुराचे लोट गठींमागे पसरीत प्रलयाग्नीप्रमाणे आला. (५९, ६० व ६१)

ततस्तद बहलोलाख्यपठाणकटकं महत् ।।
दधारान्वर्थनामार्थं तद्वक्तुं केन पार्यते ।। १२ ।।

तेव्हां त्या बहलोल पठाणाच्या प्रचंड सैन्यांत धांदल उडून गेली त्याचें वर्णन कोण करू शकेल ? (६२)

हयो यो जिनो जीनो खड्गः खड्गो धनुर्धनुः ।।
इति व्यग्रगिरं तावत्तत्सैन्यमभवत्क्षणात् ।। ३।।

'अरे माझा घोडा कोठे आहे? जीन काय झाले ? तरवार कुठे आहे ? धनुष्य काय झालें? अशी त्या सैन्याची क्षणांत गडबड उडाली.' (६३)

ततस्तेऽत्यन्तविक्रांती महाशूरा महाबलाः ।
यत्र यत्र स्थितास्तत्र शस्त्रैस्सज्जास्तदाऽभवन् । ६४ ।।

नंतर ते अत्यंत पराक्रमी शूर आणि बलवान पठाण ज्या ज्या ठिकाण होते तेथेच शस्त्रे घेऊन सज्ज झाले. (६४)

तावदेषां महावीराः प्रपेतुस्तेषु तत्क्षणात ।
ततः खणखणाटोच्चैः संबभूव द्वयोर्महान ।। ६५ ।।
हयस्थैर्भूतलस्यैश्च घटिकानां चतुष्टयम् ।
केचिन्निपतितास्तेषामेषां तैः केचिदाहताः ।।६६।।

इतक्यांत मराठ्यांकडील महा वीरांनी त्यांच्यावर तत्क्षणच हल्ला केला. तेव्हां त्या दोघांच्या घोडदळ आणि पायदळ यांच्यामध्ये चार घटका युद्धाचा मोठा खणखणाट झाला. त्यांच्यापैकी काही ठार होऊन पडले. ह्यांच्या कांही त्यांनी मारले. (६५व ६६)

परावृत्य हयान्केचित्तेभ्यो ह्येते बहिर्ययुः ।
ततस्ते दृढमासज्य जयविस्फूर्जितं धनुः ।। ६७ ।।
घुन्वाना जगृहुर्बाणान वारबाणविदारणान ।
आयात्विदानीमित्युच्चैः प्रोचुराकृष्टकार्मुकाः ।। ६८ ।।
जघ्नुर्हयान हयारुढान एकीभूय समन्ततः ।।
तावदानन्दरायोसौ संपरायश्रियान्वितः ।। ६९ ।।

ह्यांचे कांहीं स्वार त्यांच्यापासून घोडे परतवून बाहेर निघून गेले. नंतर जयाने टणत्कार करणारे धनुष्य घट्ट धरून हलवीत त्यांनी चिलखत फोडून जाणारे असे बाण हातांत घेतले व धनुष्याची दोरी ओढून 'येऊ देत आतां'। असे मोठ्याने ओरडून चोहों बाजूंनी एकत्र होऊन घोड्यांना व स्वारांना बाण मारू लागले. (६७, ६८ व ६९)

पपात पृष्ठतो भूत्वा वीरैः कतिपयैस्तदा ।
सोऽतिविद्धोऽपि क्रुद्धैस्तैर्मस्तके दत्तखेटकः ।। ७० ।।
प्रविष्टः खड्ग मुद्यम्य पठाणविकटाटवीम । ।
तेनैवात्युल्बणं तेषां कटकं घटिकात्रयम ।। ७१ ।।

लगेच युद्धश्रीने चमकणाऱ्या आनदरावाने यांच्या पिछाडीला होऊन कांहीं वीरांसह त्यांच्यावर हल्ला केला. क्रुद्ध शत्रूने त्यास अतिशय जखमी केला असतां तो डोक्यावर ढाल

धरून व तरवार उगारून पठाणसेनारूपी भयंकर अरण्यांत घुसला. आणि त्यानेच तीन घटकांपर्यंत शत्रुसैन्याची त्रेधा उडविली, (७० व ७१)

विहितं तावदुन्मत्तः कुंजरः पर्वतोपमः।
विमुक्तस्तन वै चक्रे कौतुकं संगरांगणे ।। ७२।।

इतक्यांत पर्वताप्रमाणे एक प्रचंड, उन्मत्त हत्ती सुटला. त्यानें खरोखर समरांगणावर मजा उडवून दिली. (७२)

स्वयं तेनातिबलिना त्रोटिता दृढचेष्टिता ।।
शृखलेव करे कृत्वा धावित्वा व समागतम् ।। ७३ ।।

तो अत्यंत बलवान हत्तीने घट्ट बांधलेली शृंखलाच स्वतः तोडून ती सोंडेत धरून धांवत सुटला. (७३)

भृशं तेनैव विहितं सैन्यमत्यन्तमुल्बणम् ।
स्वीयानेव समीपस्थान व्यूहस्थानवधीत्तदा ।। ७४ ।।

व आपल्या सैन्यात त्यानेच खूप दाणादाण उडविली; आणि जवळ असलेले आपलेच गोलांतले लोक ठार केले. (७४)

मन्ये शिवसहायार्थै हेरंबोऽसी समागतः ।
ततो होतैश्च तेनाऽपि वारणेनाद्भुतो रणः ।। ७५ ।।
हासत्रासयुतस्तत्र संजज्ञे वाग्गोचरः ।।
ततो हस्तिपकै स्तस्य पश्चादेव्र प्रधावितैः ।। ७६ ।।
युया पृष्ठगतैर्वृत्वा पश्चाद्यावद्विधीयते ।।
तावत्सद्धिहिलालोऽसौ स्वपुत्रैः पंचभिः सह ।।७७।।
गतभर्निष्पपातोच्चैः श्यामश्यामैः स्वसैनिकैः।

मला वाटते की, शिवसाह्यार्थ हा गणपतीच धावून आला; नंतर त्या हत्तीशी मराठ्यांनी हंस व भीती उत्पन्न करणारे असे अद्भुत युद्ध केले तें वर्णनातीत आहे. नंतर त्याचे माहूत पाठीमागून धावत येऊन युक्तीने त्याला पकडून पाठीमागे नेतात तो सिद्दी हिलाल आपले पांच पुत्र व काळेकभिन्न सैनिक यांसह निर्भयपणे चढाई करून गेला. (७५, ७६, ७७, व ७७।।)

रूपाजीभोसला तावत्सामजीमोहितस्तथा ।। ७८ ।।
निंबाळकरसद्धोजी प्रसिद्धो युद्धकर्मणि ।।
तेलंगदायसहिताः निष्पेतुरहिते तदा ।। ७९ ।।

रुपाजी भोंसला, सामजी (सोमाजी) मोहिता आणि युद्धांत प्रख्यात असा । सिदोजी निंबाळकर हे तेलंगी सैन्याच्या तुकडीसह शत्रूवर चालून गेले. (७८ पूर्ण व ७९).

तावद्विठोजिसिंदाऽसौ तथा विठ्ठलपीलद्या ।।
उभावप्येकतो यात महत्या सेनया सह ।। ८०।।

इतक्यांत विठोजी शिंदा व विठ्ठल पिलदेव हे दोघेही एका बाजूने मोठ्या सैन्यासह चालून गेले. (८०)

महादठाकुरः क्रूर जाधोरायस्य सैनिकः ।
सोमाजीकेन सहितः सोऽप्यग्रे प्राभवत्तदा ।। ८१ ।।

जाधवरावाचा क्रूर सेनापति महादजी ठाकूर हा सुद्धा सोमाजीसह पुढे सरकला, (८१)।

ततस्तेषां पठाणानां भायखानतरीनिति ।
करीव संगरे तावनिर्व्यग्रमनसाभवत् ।। ८२ ।।

तेव्हां त्या पठाणांचा भाईरखान तरी या नांवाचा सेनापति हत्तीप्रमाणे युद्धांत शांत चित्ताने पुढे आला. (८२)

नायीकजी पांडरासौ खराडानायकस्तथा ।
तथैवान्येऽपि शतशो निसृतास्तन्मुखोपरि ।। ८३ ।।

पांडरा नाईक, खराडा नाईक आणि दुसरे हि शेकडों वीर त्याच्यावर चालून गेले. (८३)।

ततस्सम्भवत्तेषामेतेषां च महद्रणः ।
बाणैर्बाणधराञ्छु रान खड्गैः खड्गधरांस्तथा ।। ८४ ।।
शक्तया शक्तिधरान युद्धे विव्यधुस्ते निजायुधैः ।।
केषांचिद्बाहवच्छिन्नाः केषांचिच्चरणास्तथा ।। ८५ ।।

त्या वेळी पठाणांचे व मराठ्याचे मोठे युद्ध झाले. बाणधाऱ्यांना बाणांनी,: खड्गधाऱ्यांना खड्गांनी, भालाधाऱ्यांना भाल्यांनी याप्रमाणे त्यांनी आपल्या आयुधांनी युद्धांत प्रहार केले. कित्येकांचे बाहू तुटले, कित्येकांचे पाय तुटले, (८४ व ८५).

केषांचिन्मस्तकाः खर्मिकृत्ताधः पतंत्यधः ।।
कश्चिद्रुधिरसिकांगः प्रफुल्ल इव किंशुकः ।। ८६ ।।

आणि कित्येकांची तरवारींनी अर्धी तोडलेली डोकी खाली पडली, कोणी रक्ताची आंघोळ झाल्यामुळे फुललेल्या पळसाप्रमाणे दिसू लागला, (८६)

कश्चिद्बाणैस्त्रिकैः लग्नैः सनिषंग इव स्थितः ।।
स्फिकेनैकेन संतिष्ठन् कश्चिद्द्त्रुटतत्रिकः ।। ८७ ।।
कश्चिद्द्वित्रुटितीर्धेन खडग्न हृदि विक्षतः ।
एवं यामत्रयादुवै क्रुद्धयोः सैन्ययोद्वयोः ।। ८८ ।।
रणः समभवत्तावद्यावदस्तोऽभवद्रवेः ।
उच्छलद्रक्ततुमुल प्रवाहस्तत्र निस्सृतः ।। ८९ ।।

कोणी पाठीवर बाण लागल्यामुळे जणू काय बाणांच्या भात्यासह उभा आहे असा दिसत होता. माकडहाड मोडल्यामुळे कोणी एकाच कुल्यावर बसून राहिला आणि कोणाच्या छातीवर अर्ध्या मोडलेल्या तरवारीचे घाव पडले होते. याप्रमाणे तीन प्रहारापेक्षा अधिक वेळ

त्या खवळलेल्या दोन्ही सैन्यांमध्ये सूर्यास्तापर्यंत युद्ध झाले. वर उडणाऱ्या (चिळकांड्या उडणाऱ्या) रक्ताचा जोराचा प्रवाह वाहूं लागला. (८७, ८८ व ८९)

आरक्तरागः संध्यायास्तेनैव विहितोऽभवत ।
सिद्धोजीनामकस्तावनिंबाळकर संज्ञिकः ।। ९० ।।
स एव वारणस्तेन रणान्निःसारितस्तदा ।।
स्वयं मुक्तः स्थितः पूर्व श्रृंखलानिगडाद्दढात ।।९१ ।।
यगाव सिद्धमार्गेण नीतः श्रीमच्छिवांतिके।

त्यायोगेच जणू काय संध्याकाळ आरक्तता (लाली) आली. त्या सिद्दोजी निंबाळकराने त्या हत्तीला रणभूमीतून पिटाळून आणले. घट्ट शेखलेपासून पूर्वी स्वतःच मोकळा सुटलेला तो हत्ती योग्याप्रमाणे सिद्ध पुरुषाने दाखविलेल्या मार्गाने शिवा(जी) सन्निध नेला (पाठविला) गेला. (९०, ९१ व ९१।।.)

बहलोलस्य विषयी नाम्ना भाग्येन विश्रुतः ।। ९२ ।।
श्यामो महमबर्कोति जयद्रथ इवाबभौ ।
दौर्योधनैः कतिपयैः सैनकैः परिवारितः ।। ९३।।

सिद्दी महमद बर्क या नांवाचा ऐश्वर्याने विख्यात असा बहलोलखानाचा सोबती दुर्योधनाच्या थोड्याशा सैनिकांनी परिवेष्टित अशा जयद्रथाप्रमाणे दिसू लागला. (९२ पूर्ण, व ९३)

स वै सूर्यास्तमालक्ष्य पांसुव्याप्ते खमण्डले।
महावाजिनमारुह्य गजव्यूहाद्विनिःसृतः ।। ९४ ।।

तो आकाश धुराळ्याने व्याप्त झाले असतां सूर्यास्त होतो आहे असे पाहून मोठ्या घोड्यावर आरूढ होऊन गजव्यूहामधून बाहेर पडला. (९४)

दीपाजनामको ह्येषां राउतराव इतिस्मृतः ।।
सोऽर्जुनत्वमनुप्राप्तो ततःकृष्णसहायवान ।। ९५ ।।

मराठ्यांकडील दिपजी राऊतराव नांवाचा अति विख्यात वीर कृष्ण हा ज्याचा सखा (साह्य कर्ता) आहे अशा अर्जुनाप्रमाणे दिसू लागला. (९५)

प्रोद्दीपे स दीपाजी सकृष्णो भास्करत्विषा।
आपूरयन्निव स्वीयां प्रतिज्ञां तद्रणांगणे ।। ९६ ।।
विकोशं खड्गमुद्यम्य वाजिवेगोद्धतस्ततः ।
वारबाणावृतं शत्रु स्कंधदेशे व्यताडयत् ।। ९७ ।।

तो दिपाजी कृष्णाजी भास्करासह सूर्याप्रमाणे चमकू लागला. त्या रणांगणांमध्ये आपली प्रतिज्ञा जणुं काय पूर्ण करण्यासाठी नागवी तरवार उगारून व घोडा भरधांव सोडून चिलखत घातलेल्या शत्रुच्या खांद्यावर त्याने वार केला.(९६व ९७)

तेन खड्गप्रहारेण शत्रोः कवचपट्टिका ।।
समुत्पफोल गगने मेघादचिरभा यथा ।। १८ ।।

ज्याप्रमाणे मेघातन वीज कडाडून बाहेर पडते त्याप्रमाणे त्या तरवारीच्या घावाने त्या शत्रूच्या अंगांतील कवचाचे तुकडे आकाशात वर उडाले. (९८)

ततस्तद्बर्किना तावत समुद्यम्य महद्धनुः ।।
आकर्णकृष्टबाणेन विद्धो राउन्नावहयः ।। ९९ ।।

नंतर त्या बर्कीने लगेच आपले मोठे धनुष्य उचलून धरून कर्णापर्यंत बाण ओढून राऊतरावाच्या घोड्यांस वेध केला. (९९)

स हयस्तेन बाणेन प्राणानेव विमोचितुम ।
तथा प्रकंपमापन्नस्ततोन्यस्मिन्योत्तमे ।। १०० ।।

तो घोडा त्या बाणाच्या प्रहाराने प्राणच सोडतांना फार कांपू लागला. (१००)

समारूढोऽभवत्तावत सोऽपि खड्गेन विक्षतः ।।
कुक्षौ त्रिके मुखे चैव प्रहारत्रयसंयुतः ।। १०१ ।।

तेव्हां तो (दिपाजी) दुसऱ्या उत्तम घोड्यावर आरूढ झाला, इतक्यांत याच्या (घोड्याच्या) सुद्धा बगलेत (कुशीत), पाठीवर व मुखावर तरवारीचे तीन घाव बसले. (१०१)।

तथापि न चचालाजौ यतो जातोस्ति सैंधवः ।
ततस्तेन प्रदीप्तेन राउत्रायेण संयुगे ।। १०२।।
यमदंष्ट्राप्रहारेण स बर्की मस्तकादधः ।
जत्रुदेशे विकवचे हत्वा भूमौ निपातितः ।। १०३ ।।

तथापि युद्धामध्ये तो ढळला नाही, कारण तो घोडा तेजस्वी (जातीवंत) होता. नंतर त्या खवळलेल्या राऊतरावाने लढाईत त्या बर्कीला मस्तकाच्या खाली खांद्याच्या उघड्या (चिलखतरहित) सांध्यावर प्राणहारक प्रहार करून भूमीवर पाडला. (१०२ व १०३)

ततस्तस्य पठाणस्य घोटपृष्ठ सुभूषिते ।।
समारुह्य समायातो विजयत्वं प्रवर्धयन् ।। १०४ ।।

नंतर त्या पठाणाच्या उत्तम रीतीने शृंगारलेल्या घोड्याच्या पाठीवर बसून (दिपाजी) विजयी होऊन आला. (विजय वृद्धिंगत करीत आला.) (१०४)

अथ तद्बर्किनस्तावन मृत्युमाकर्ण्य विव्हलः ।
प्रतापदर्शिते मार्गे बाहुलोलो विनिर्गतः ।। १०५ ।।

नंतर त्या बर्कीचा मृत्यू ऐकून विव्हल झालेला बहलोलखान प्रतापरावानें। दाखविलेल्या मार्गाने निघून गेला. (१०५)

पश्चात्तस्यातिसंविग्ने हस्त्यश्वरथसंकुलम् ।।
कटकं लुटयामास स कृष्णो भास्करात्मजः ।। १०६ ।।

मागाहून त्या कृष्णाजी भास्कराने त्याचे अत्यंत चिंताक्रांत झालेले हत्ती, घोडे व रथ यांचे मिश्र सैन्य लुटले. (१०६)

विजयपुरसमुद्रादुच्छलन्नक्रचक्रात समुदितबहलोलः पार्वणोऽसौ शशांकः ।
इति खलु निजलक्ष्मी प्राक्षिपत्कृष्णपक्षे प्रतिदिवसमशेषां
भास्करादुत्थितेऽस्मिन् ।। १०७ ।।

ज्यांत सुसरींचा समुह उसळ्या मारीत आहेत अशा विजापूरच्या सेनासमुद्रांतून हा बहलोलखान पौर्णिमेचा (पूर्ण) चन्द्र जणू वर आला, व त्याने विचार केला की प्रतिदिवशीं भास्करापासून (सूर्यापासून) उत्पन्न होणारा हा कृष्णाजी (कृष्ण) पक्ष आहे म्हणून तो त्यांत आपले स्वतःचे सर्व ऐश्वर्य (तेज) सोडून दिले. (१०७)

इति श्रीमज्जयरामविरचिते पर्णालपर्वतग्रहणाख्याने श्रीशिवराजचरित्रे पंचमोऽध्यायः ।
श्रीविश्वेश्वरार्पणमस्तु ।
श्रीमज्जयराम कविविरचित श्रीशिवाजी चरित्रांतील पर्णालपर्वतग्रहणाख्यानाचा पांचवा अध्याय समाप्त.

। श्रीविश्वेश्वरार्पणमस्तु । ।। श्रीगणेशाय नमः ।। श्री ।। ८१ ।।

****